मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

नाशिक

PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 » मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५ » वर्ष: १ » अंक:७९ » पाने-८

» किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

» मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

» पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

» नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

» वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

## पुतीन यांचा मोदींना फोन

**नवी दिल्ली , दि. १८ वृत्तसंस्था**

रशिया आणि युक्रेन युद्धाकडे अवघ्या जगाचे लक्ष लागले असून हेही युद्ध थांबावे अशी भारतसह जगभरातील अनेक देशांची इच्छा आहे. त्याच अनुषंगाने रशियाचे राष्ट्रपती पुतीन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यात भेट होऊन चर्चा झाली होती. त्यानंतर, व्लादीमीर पुतीन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना फोन करुन यासंदर्भात माहिती दिली. अलास्का येथे पुतीन आणि ट्रम्प यांच्यात भेट होऊन युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चा झाली होती. या चर्चेनंतर पुतीन यांच्यासमवेत फोनवरुन बोलणं झाल्याचं पंतप्रधान मोदींनी ट्विट करुन सांगितलं आहे. रशिया आणि युक्रेन यांच्या सुरू असलेल्या युद्ध परिस्थितीवर शांतीपूर्ण समाधान काढण्यात यावे, त्यासाठी भारत खंबीरपणे रशियाच्या पाठीशी असल्याचं मोदींनी म्हटलं. तसेच, याबाबत सुरू असलेल्या सर्वच प्रयत्नांना भारताचे समर्थन असल्याचेही मोदींनी सांगित ले. पंतप्रधान मोदी आणि पुतीन यांच्यात झालेल्या फोनवरील संभाषणात दोन्ही देशांमधील द्विपक्षीय सह्योगावर देखील चर्चा झाली असून पंतप्रधान मोदींनी पुतीन यांच्या फोनबद्दल आभार मानले आहेत.

अग्रलेख

## खरीखरी

## पावसाचा कहर

उत्तराखंड पासून महाराष्ट्र पर्यंत यत्र, तत्र आणि सर्वत्र पावसाने थैमान मांडलेले आहे. आपल्या पर्यावरणाशी आपणच मोठा खेळ खेळल्यामुळे आता आपल्याच पर्यावरणाने आपला घात करण्याचे ठरवलेले दिसत आहे. कारण सध्या हवा तेव्हा पाऊस येत नाही नको तेव्हा पाऊस येतो त्या पावसाचे प्रमाण आटोक्या बाहेरचे असते. तो पाऊस प्रचंड प्रमाणात ढासळतो. आपल्या महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमधील अनेक नद्यांना महापूर आलेला आहे गावागावात अनेक ठिकाणी सर्व नदी, नाले आणि या प्रलयामुळेही अनेक गावेच्या गावे तुडुंब भरलेली आहेत. कोकणात पावसाने आपला महाप्रताप दाखवला आहे. मुखेड मध्ये तर अक्षरशः कहर झाला आहे. मुंबइसारख्या शहरात सर्व व्यवहार अत्यंत उशिराने होत आहेत, मुंबइ सह पालघर ठाण्यामध्ये शाळा महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आलेली आहे. सगळे जनजीवन अस्ताव्यस्त झालेले आहे तरीही असाच पाऊस सुरू राहिला तर शेतीचे फार मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर नेहमीच गंभीर संकट असते दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बातम्या येतात आता आपले मन इतके बथ्थड झालेले आहे की शेतकऱ्यांच्या आत्महत्येला वृत्तपत्रांमध्येही लहानशा बातमी इतकी म्हणजेच सिंगल कॉलम इतकीच जागा मिळते. मग आपल्या देशात कोण्या एकेकाळी मोठ्या प्रमाणात वने होती. आपल्या प्रचंड मोठ्या प्रमाणात असलेल्या या विकासवादी दृष्टिकोनामुळे आणि आघोरीपणामुळे हीच घनदाट वने विरळ झालेली आहेत. अनेक ठिकाणी वने शिल्लकच उरलेली नाहीत. विकासाच्या नावावर गडचिरोली सारख्या घनदाट वनांचा जिल्हा आता नक्षलवाद विरहित होणार आहे आणि त्यासोबतच तो वनविरहित होतो की काय अशीही शंका आहे. मोठमोठ्या महामार्गाच्या स्थापनेसाठी मोठमोठी झाडे आणि गरीब शेतकऱ्यांची शेती ज्याच्यामध्ये काहीही पिकू शकते अशी शेती आणि वनाची झाडे एखाद्या सलूनमध्ये एखादा न्हावी जसे केस भराभर कापतो त्याप्रमाणे सपासप कापली जात आहेत. मुंबइसारख्या महानगरालगत वृक्षांचा वेढा होता. आरे मधील वनांमुळे मुंबइत ऑक्सिजन मिळत होता अशा या आरे कॉलनी मधील वनांवर निष्ठुरपणे आरी चालवून केलेले घनघोर हल्ले आजही ताजे आहेत. शेतकऱ्यांपासून सामान्य नागरिकांपर्यंत निसर्गाची विनाशलीला सर्वजण बघत आहेत आणि या गोष्टी सर्वांनाच बाधत आहेत. या सर्व वातावरणीय बदलांचा परिणाम भविष्यकाळात किती भयानक होऊ शकतो हे फक्त एकूनच डोके अक्षरशा चक्राहून जाऊन वेड लागण्याची पाळी आलेली आहे. हिमालयातील रेषीयर्स म्हणजेच हिमनग दिवसेंदिवस आकुंचन पावत आहेत. आपल्या जवळजवळ सर्व नद्या म्हणजेच बऱ्याचश्या नद्या ६० ते ७० टक्के वर्षांपूर्वी बारमाही होत्या. आत्ताच्या परिस्थितीमध्ये त्या फक्त पावसाळी झालेल्या आहेत. मुंबइमध्येही चार-पाच नद्या होत्या. त्या आता सांडपाणी वाहून नेत आहेत. पुण्याच्या मुळा-मुठा कितीतरी आघात सोसत आहेत. सध्या येण केण प्रकारेण मनपा ते ग्रामपंचायती शुद्ध आणि चांगल्या पाण्याचा पुरवठा करीत असतात. उद्या या पाण्याची शाश्वती नाही कदाचित मुंबइकरांना समुद्राचे पाणी गोड करून प्यावे लागेल अशी परिस्थिती आहे. प्रत्येक बाबतीत काही राजकारण्यांना कारणाशिवाय सदैव लढाइच करायची असते जनजीवन सुखकर व्हावे आरोग्यदायी व्हावे अल्हाददायी व्हावे याची कुणालाही पर्वा नाही. त्यांचे पायाला मिठी मारणारे भक्तही तेच करतात. पावसाच्या कहराची अशी बरीचशी वेगवेगळी कारणे आहेत. त्याचा सगळ्यांनी विचार करायला पाहिजे. सध्या राजकारणात बुडालेल्या कोणाजवळ वेळ आहे?

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# झोडपले



## पावसाचा मुंबईच्या वाहतुकीवर परिणाम
## लोकल धीम्या गतीने
## रस्त्यांवर वाहतूक कोंडी

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

**गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाच्या संततधारेचा परिणाम मुंबईच्या वाहतुकीवर झाला आहे. रविवारी मध्यरात्रीपासून जोरदार पाऊस बरसत असल्यानं सोमवारी सकाळी रस्ते वाहतूक मंदावली, तर लोकल रेल्वेच्या सेवेवरही परिणाम झाला. पावसाचा जोर कमी न झाल्यास विशेषतः पश्चिम उपनगरात सखल भागात पाणी साचण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.मुंबई महापालिकेनं दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी ६ वाजेपर्यंत मुंबई शहरात ४५.०३ मिमी पावसाची नोंद झाली. तर पूर्व उपनगरात ६०.५७ मिमी आणि पश्चिम उपनगरात ५२.३० मिमी पाऊस झाला. परिणामी मध्य रेल्वेची वाहतूक किमान १० मिनिटं, हार्बर रेल्वे ५ ते १० मिनिटं उशिरानं सुरू होती. त्यामुळं कामावर पोहोचण्यास काही जणांना उशीर झाला. मुंबईला आज ऑरेंज अलर्ट देण्यात आल्यामुळं पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.**

मध्य भारतावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होत असल्यानं त्याच्या प्रभावामुळं कोकण, मध्य महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), मुंबई महानगर प्रदेश आणि मराठवाड्यात (प्रामुख्याने पश्चिम आणि दक्षिण भाग) १८ ते १९ ऑगस्ट दरम्यान जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यात प्रामुख्याने कोकणातील सर्वच जिल्हे नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, पालघर, ठाणे, उर्वरित मुंबई महानगर; सोलापूर, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांचा काही भाग यांचा समावेश आहे. या दरम्यान खान्देश आणि उर्वरित मराठवाड्यातदेखील मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. या दरम्यान कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसरातील धरण साठ्यात वाढ होऊन नदी-नाल्यांना पूर येण्याची शक्यता आहे. तसंच काही प्रमाणात दरड कोसळणे आणि मुसळधार पावसामुळे सखल भागांमध्ये पूरस्थिती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे नागरिकांनी सतर्क राहावं, असं आवाहन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आलं आहे. राज्यात पुढील २४ तासांसाठी पुणे घाट भागात रेड अलर्ट देण्यात आला असून, पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, या जिल्ह्यांत तसेच सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या दरम्यान समुद्राची स्थिती खवळलेली आणि ताशी ५०-६० किमी वारे वाहण्याची शक्यता असल्यानं मच्छीमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली आहे.

### अतिमुसळधार पावसाचा इशारा

पूर्ण महाराष्ट्रात मान्सून पुन्हा एकदा सक्रिय झाला असून, भारतीय हवामान खात्याने अनेक जिल्ह्यांसाठी अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. मुंबई, रायगड, पुणे घाट, सातारा घाट, रत्नागिरी आणि कोल्हापूर घाट या भागांसाठी 'रेड अलर्ट' जारी करण्यात आला आहे. याशिवाय पालघर, ठाणे, सिंधुदुर्ग, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, अमरावती, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांनाही 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, पुढील २४ ते ४८ तासांत या जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने सर्व संबंधित जिल्ह्यांमध्ये सतर्कतेचा इशारा दिला आहे. विशेषतः रेड अलर्ट जारी केलेल्या भागांमध्ये नागरिकांना अनावश्यक घराबाहेर न पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### दुपारच्या सत्रातील शाळा-महाविद्यालयांना सुट्टी

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

मुंबईत आज सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शिक्षण क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. भारतीय हवामान विभागाने अतिमुसळधार पावसाचा इशारा दिल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दुपारच्या सत्रातील सर्व शाळा व महाविद्यालयांना तातडीने सुट्टी जाहीर केली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने घेतलेल्या या निर्णयामुळे पालकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना स्पष्ट आवाहन केले आहे की "अत्यावश्यक कारणाशिवाय घराबाहेर पडू नये." अधिकृत माहिती व मदतीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्षाशी १९१६ या क्रमांकावर संपर्क साधण्याची विनंती करण्यात आली आहे.

## मुखेडमध्ये पावसाचा हाहाकार !
### ८०० गावांना फटका, २२६ लोकांची सुटका





**नांदेड, दि. १८ प्रतिनिधी**

पावसाने संपूर्ण राज्याला झोडपून काढले आहे. पण त्याचा सर्वाधिक फटका हा नांदेड जिल्ह्याला बसला आहे. जिल्ह्यातील मुखेडमध्ये ढगफुटी झाली आहे. मुखेड आणि मुक्राबादचा परिसर यामुळे बाधित झाला आहे. या भागात तब्बल २०६ मिली मिटर पावसाची नोंद झाली आहे. हा पाऊस म्हणजे ढगफुटी म्हटले जाते. या पावसाने संपूर्ण परिसरात हाहाकार माजला असून तब्बल ८०० गावांना याचा फटका बसला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. इथं मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. शिवाय सैन्यालाही मदतीसाठी पाचारण करण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये बीड, लातूर, नांदेड या जिल्ह्यात पूरस्थिती आहे. पण सर्वाधिक फटका हा नांदेड जिल्ह्यातील मुखेडच्या विक्रमाबाद भागाला बसला आहे. इथं तब्बल २०६ मिली मिटर पावसाची नोंद झाली आहे. या ढगफुटीत ५ लोक बेपत्ता झाले आहेत. त्याचबरोबर १५० जनावरं वाहून गेली आहेत. अनेक गावामध्ये लोकं अडकून पडले आहेत. एनडीआरएफची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. त्यांनी बचाव कार्यही सुरू केले आहे. मात्र तिथली परिस्थिती पाहता सैन्यालाही पाचारण करण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

याच परिसरातील रावणगावला सर्वात जास्त फटका बसला आहे. या गावात अडकलेल्या २२६ लोकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. याशिवाय अन्य शेजारच्या ४ गावातून लोकांना सुखरूप बाहेर काढण्याचं काम सुरू आहे. या ढगफुटीमुळे जवळपास ८०० गावं बाधित झाली आहेत. तर १ लाख हेक्टर शेतीचं नुकसान झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तातडीची मदत देण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यांना निधीही उपलब्ध करून देण्यात आल्याचं फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

## २०१४ मध्येच भाजपा शिवसेनेला हात दाखवणार होती - प्रफुल्ल पटेल

**गोंदिया, दि. १८ प्रतिनिधी**

भाजपा शिवसेनेला आणि राष्ट्रवादी हा पक्ष काँग्रेसला सोडणार आणि राष्ट्रवादी- भाजपा सोबत सत्तेत बसणार ही स्क्रीप्ट २०१४ मध्येच लिहिली गेली होती. परंतु, गडबड झाली आणि आम्ही मागे राहिलो, असा गौप्यस्फोट अजित पवार राष्ट्रवादीचे नेते, खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केला आहे.

गोंदियात महायुतीच्या वतीने आयोजित सत्कार समारोप कार्यक्रमांमध्ये बोलत होते. यावेळी त्यांनी २०१४ मध्ये घडलेल्या राजकारणावर गौप्यस्फोट केला. भाजपासोबत येण्याची खूप आधीपासून आमची आणि मोठ्या साहेबांची (शरद पवार) देखील इच्छा होती, मात्र, गाडी स्लीप होऊन जात होती, असे पटेल यांनी सांगितले. २०१४ च्या निवडणुकीत आम्ही काँग्रेसचा हात सोडायचा आणि भाजपवाल्यांनी शिवसेनेचा हात सोडायचा असे ठरलेले होते. २०१४ च्या निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी मी स्वतः बाहेरून पाठिंबा देत असल्याची घोषणा केली आणि आमच्या सहकार्याने हरिभाऊ बागडे स्पीकर म्हणून निवडून आले. पण पुन्हा गडबड झाली आणि आम्ही मागे राहून गेलो, असे पटेल म्हणाले.

## संजय शिरसाटांकडून पाच हजार कोटींचा भ्रष्टाचार- रोहित पवार

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यावर पाच हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा खळबळजनक आरोप केला आहे. संजय शिरसाठ यांनी पाच हजार कोटी रुपयांची १५० एकर जमीन नवी मुंबईतील बिवलकर कुटुंबाला दिली. २०२४ साली सिडकोचे अध्यक्ष होताच संजय शिरसाट यांनी बिवलकर कुटुंबाला जमीन देण्याच्या आदेशावर सही केल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. मराठा साम्राज्यासोबत गद्दारी करणाऱ्या बिवलकर कुटुंबाला जमीन देऊन संजय शिरसाट यांनी स्थानिक भूमीपुत्रांशी गद्दारी केली आहे. इंग्रजांशी हातमिळवणी करणाऱ्या व्यक्तीशी हातमिळवणी संजय शिरसाट यांनी केली आहे. त्यामुळे त्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ राजीनामा घ्यावा, अशी मागणी देखील रोहित पवार यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी स्पेशल टास्कफोर्स नेमावी किंवा निवृत न्यायाधिशांच्या मार्फत चौकशी करावी, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

रोहित पवार पत्रकार परिषदेत म्हणाले की, गँग्स ऑफ गद्दार या विषयावर मी बोलणार आहे. ब्रिटिश काळात नवी मुंबईतील बिवलकर कुटुंबीयांनी मराठा साम्राज्या विरोधात इंग्रजांना मदत केली. त्याबदल्यात त्यांना चार हजार पेक्षा जास्त रोहा, पनवेल, अलिबाग या भागातील जमीन बक्षीस म्हणून देण्यात आली. १९५९ साली बिवलकर कुटुंबाने सिलिंग कायद्यातून स्वतःला वाचवून घेतलं आणि चार हजार एकर जमीन वाचवली. मात्र १९७१ साली ही जमीन सरकारकडे जमा झाली. १९९० साली त्यांनी आपली जमीन परत मिळावी म्हणून मागणी केली. त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी ती जमीन माघारी देण्याचा अर्ज फेटाळला. त्यानंतर कोर्टात हा विषय सुरू होता.

१९७१ मध्ये नवी सिडकोने विविध कामांसाठी जमिनी घेण्याचा निर्णय घेतला. १९८३ साली या जमिनी ताब्यात घ्यायला सुरुवात झाली. १९८७ मध्ये महसूल विभागाला हाताशी धरून बिवलकर कुटुंबाने जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. १९९० साली शरद पवार, दी. बा. पाटील यांनी साडे बारा टक्के योजना आणली. त्यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना पैसा मिळू लागला. त्यावेळी बिवलकर यांनी सरकारकडे आपली जमीन आहे. त्याबदल्यात साडे बारा टक्के योजनेचा फायदा द्या, अशी मागणी केली होती. त्यावेळी एमडी अनिल डिग्गीकर होते. त्यांनी ही मागणी फेटाळून लावली. त्यानंतर आलेल्या तीन एमडीनी बिवलकर कुटुंबाची मागणी फेटाळून लावली. त्यानंतर २३ फेब्रुवारी २०२४ साली विजय सिंघल एमडी झाले. त्यांच्याकडे ही जमीन ताब्यात देण्याची मागणी करण्यात. त्यांनी डोकं चालवलं आणि सिडको एमडी नेमण्याची मागणी केली. त्यानुसार ज्यांच्या घरात पैशांची बॅग सापडली त्यांना अध्यक्ष बनवले. मंत्री संजय सिरसाट यांनी जवळपास ६१००० स्क्वे. मीटर जमीन बिवलकर कुटुंबाला देण्याचा निर्णय घेतला.

संजय शिरसाट यांनी ते अध्यक्ष असताना हा निर्णय घेतला आहे. हा सरळसरळ भ्रष्टाचार केला आहे. सुप्रीम कोर्टाने नुकताच निकाल दिला आहे. झुडपी जंगल जमीन पुन्हा माघारी घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये बिवलकर कुटुंबाची देखील जमीन येते. ती तत्काळ माघारी घ्यायला हवी. २० तारखेला सिडकोवर भव्य मोर्चा घेऊन मी जाणार आहे. सकाळी ११ वाजता मोर्चा होईल. देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ शिरसाट यांचा राजीनामा घ्यावा, असे रोहित पवार म्हणाले.

## राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा
### विशेष अधिवेशन बोलवा - शशिकांत शिंदे

**सातारा, दि. १८ प्रतिनिधी**



राज्यात मुसळधार पाऊस सुरू असून मुंबईसह विविध जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून मुंबईतील रस्त्यांना वाहत्या नद्यांचे रुप आल्याचं दिसून येत आहे. मराठवाडा, विदर्भात मुसळधार पावसामुळे शेती पिकांचे आणि बळीराजाचे मोठं नुकसान झालं आहे. नदीच्या प्रवाहात जनावरे वाहून गेली असून शेतातही पाणीच पाणी झाल्याने बळीराजाला अतिवृष्टीचा फटका बसल्याचं चित्र दिसून येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केली आहे. तसेच, सरकारने विशेष अधिवेशन बोलवून शेतकऱ्यांना मदत द्यावी, असेही त्यांनी म्हटलं आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा या मागणीसाठी तात्काळ विशेष अधिवेशन घेण्याची मागणी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केला आहे. राज्यात विदर्भ, मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागात अतिवृष्टी झाली आहे. मात्र, अद्याप पंचनामे देखील झालेले नाहीत. ज्या ठिकाणचे पंचनामे झाले आहेत त्यांना अद्याप मदत झालेली नाही. त्यामुळे, राज्य सरकारने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करुन एकरी 50 हजारांची मदत करावी, अशी मागणी आमदार शशिकांत शिंदे यांनी केली आहे.

## बेस्ट पतपेढी निवडणूक - मतदारांच्या घरी पाचशेच्या नोटा असणारी पाकिटे पोहोचली, संदीप देशपांडे संतापले

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यामुळे प्रतिष्ठेच्या झालेल्या दी बेस्ट एम्प्लॉईज को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीसाठी सोमवारी मुंबईत मतदान पार पडत आहे. आज सकाळी आठ वाजल्यापासून या निवडणुकीच्या मतदानाच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. या निवडणुकीत बेस्ट कर्मचारी संघटनेतील तब्बल १५ हजार कर्मचारी मतदान करणार आहेत. या निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंच्या उत्कर्ष पॅनेलसमोर महायुतीच्या नेत्यांनी सहकार समृद्धी पॅनेल रिंगणात उतरवले आहे. गेल्या २५ वर्षांपासून बेस्ट पतसंस्थेवर शिवसेनेचे एकहाती वर्चस्व होते. या काळात पतसंस्थेत मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप महायुतीच्या नेत्यांनी केला होता. याच पार्श्वभूमीवर मतदानाला अवघे २४ तास शिल्लक असताना दी बेस्ट एम्प्लॉईज को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या २१ संचालकांना आर्थिक गुन्हे शाखेने चौकशीसाठी नोटीस धाडली होती. यावरुन भुवया उंचावल्या असतानाच आता मतदानाच्या आदल्या दिवशी सहकार समृद्धी पॅनेलने मतदारांना बंद लिफाफ्यातून पैसे पाठवल्याची बाब समोर आली आहे. मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेत याबाबत भाष्य केले.

आज बेस्ट पतपेढीची निवडणूक झाली. अनेक पॅनेल निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या निवडणुकीत अतिशय घाणेरडे राजकारण खेळले जात आहे.



मतदारांना पैशांचं आमिष दाखवले जात असून त्यांच्या घरी पैसे पाठवले जात असल्याचा आरोप संदीप देशपांडे यांनी केला. दत्तात्रय पेडणेकर यांच्या घरी सहकार समृद्धीचे एक पॅम्प्लेट पाठवण्यात आले होते. या पॅम्प्लेटच्या आत एक पांढऱ्या रंगाचा लिफाफा होता. त्यामध्ये पाचशेच्या दोन नोटा होत्या. इतक्या घाणेरड्या पद्धतीने निवडणूक लढवली जात असतील तर आयुक्तांनी कारवाई केली पाहिजे. आम्ही यासंदर्भात त्यांच्याकडे तक्रार करणार आहोत. मात्र, बेस्टचे सगळे मतदार सुज्ञ आहेत, ते अशा भुलथापांना बळी पडणार नाहीत, धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असे संदीप देशपांडे यांनी म्हटले.

बेस्ट पतपेढी निवडणुकीसाठी आज मतदान होणार आहे. या निवडणुकीचा निकाल मंगळवारी जाहीर होईल. या निवडणुकीत ठाकरे बंधू विरुद्ध महायुती प्रणित संघटनांचा सामना पाहायला मिळणार आहे. ठाकरे बंधूंनी उत्कर्ष पॅनल या निवडणुकीत उतरवले आहे. यामध्ये ठाकरेंच्या शिवसेनेची बेस्ट कामगार सेना आणि मनसे बेस्ट कामगार कर्मचारी सेना यांची युती झाली आहे. तर दुसरीकडे महायुतीने सुद्धा ठाकरे बंधूंना आव्हान देण्यासाठी आमदार प्रसाद लाड आणि प्रवीण दरेकर यांची भाजप प्रणित श्रमिक उत्कर्ष सभा, नितेश राणे यांची समर्थ बेस्ट कामगार संघटना तर शिंदेंच्या शिवसेनेचे किरण पावसकर यांची राष्ट्रीय कर्मचारी सेना यांनी एकत्रित मिळून सहकार समृद्धी पॅनल निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. त्यामुळे या बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत उत्कर्ष पॅनल बाजी मारणार की सहकार समृद्धी पॅनल? याची उत्सुकता असणार आहे. या दोन पॅनल व्यतिरिक्त बेस्ट वर्कर्स युनियन पुरस्कृत शशांकराव पॅनल यांनी सुद्धा आपले २१ उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. गेली २५ वर्षे शिवसेनेची सत्ता मुंबई महापालिकेत असल्यामुळे बेस्ट पतपेढीमध्ये सुद्धा मागील नऊ वर्षापासून बेस्ट कामगार सेनेचे वर्चस्व आहे.

## भाजप नेते राम शिंदे यांच्या दाव्यावर शिक्कामोर्तब, महायुतीत खळबळ!

**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

सांगलीच्या जाहीर सभेत राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रोहित पवारांविषयी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापलं आहे. "भावकीचा विचार केला नसता तर तू आमदार झाला नसतास" या थेट टोमण्यानंतर भाजपचे वरिष्ठ नेते आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे अक्षरशः संतापले असून त्यांनी अजित पवारांवर गंभीर आरोपांची सरबत्ती केली आहे.

शिंदेंनी पत्रकार परिषदेत तुफानी हल्लाबोल करताना दावा केला की, "अजित पवार सतत मला टॉर्चर करत आहेत. त्यांच्या वक्तव्यांमुळे माझ्या पराभवामागील अघोषित करार आणि कट स्पष्ट दिसतोय." एवढंच नव्हे तर "महायुतीचा धर्म पाळला गेला नाही, अजित पवार सभेला न येऊन आमचं नुकसान केलं, त्यामुळे माझा पराभव रोहित पवारांकडून अवघ्या १२४३ मतांनी झाला," असं थेट आरोप करत त्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडे मोठ्या निर्णयाची मागणी केली आहे. या घडामोडींमुळे महायुतीत प्रचंड असंतोष उसळला आहे.



शिंदेंनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार दाखल केली असून, "अजित पवारांच्या भूमिकेमुळे महायुतीची विश्वासार्हता धोक्यात आली आहे" असा स्फोटक आरोप त्यांनी केला. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने शिंदेंचा गैरसमज झाल्याचं म्हणत बचाव केला.

परंतु प्रश्न असा की अजित पवारांचा खरंच 'भावकी'चा विचार होता की या मागे अजून काही गुपित दडलं आहे? महायुतीतील विश्वासार्हतेवरचं सावट वाढतंय की अजून एक मोठा स्फोटक वाद पेटणार आहे? राजकीय वर्तुळात आता सगळ्यांचे डोळे भाजपच्या पवित्र्याकडे लागले आहेत की त्यांचे पुढचं पाऊल काय असणार?

## महत्त्वाचे

### किल्ले रांजणगिरी येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त वृक्षारोपण



**नाशिक ।** शिवदुर्ग संवर्धन भ्रमंती संस्थेतर्फे स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने ऐतिहासिक किल्ले रांजणगिरी येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात संस्थेचे पदाधिकारी, सदस्य तसेच परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. किल्ल्याच्या परिसरात विविध प्रकारच्या छायादार, फळझाडे व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. निसर्ग संवर्धनाबरोबरच किल्ल्याचे सौंदर्य वृद्धिंगत करण्यासाठी संस्थेने हा उपक्रम हाती घेतल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर वृक्षारोपणाला सुरुवात झाली. यावेळी “किल्ले आपली संस्कृती, वृक्ष आपला श्वास” असा संदेश देत उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाची शपथ देण्यात आली. संस्थेचे कार्यकर्ते व तरुण सदस्यांनी या झाडांची देखभाल करण्याची जबाबदारी स्विकारली. शिवदुर्ग संवर्धन भ्रमंती संस्था गेल्या अनेक वर्षांपासून दुर्ग संवर्धनाबरोबरच पर्यावरण रक्षण, स्वच्छता मोहीम आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी कार्यरत आहे. स्वातंत्र्य दिनासारख्या राष्ट्रीय सणानिमित्त संस्थेच्या उपक्रमामुळे तरुणांमध्ये देशप्रेमाची भावना दृढ होत असून पर्यावरणपूरक विचारही रुजत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या मोहिमेत सोमनाथ गव्हाणे, बाळासाहेब शिंदे, आर्यन गव्हाणे, वैशाली गव्हाणे, साई गव्हाणे, शिवानी सहाणे, नंदा गव्हाणे, शाम गव्हाणे, संस्थेचे अनेक सदस्य सहभागी होते.

### दलपतपूर शाळेत सैनिकाच्या हस्ते ध्वजारोहन



**हरसूल ।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील दलपतपूर येथील पूर्ण प्राथमिक जिल्हा परिषद आदर्श शाळेत छत्तीसगड येथे कार्यरत असलेले व गावचे रहिवासी असलेले केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान अशोक सापटे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. हरसूल जवळील दलपतपूर येथे स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गावातून विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. येथील पूर्ण प्राथमिक जिल्हा परिषद आदर्श शाळेत केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान अशोक सापटे यांच्या हस्ते ध्वजपूजन करून ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक रमेश भोये, प्रकाश बोरसे यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कावनई किल्ल्यावर महाध्वजाचे ध्वजारोहण



**कावनई ।** देशाच्या स्वातंत्र्यापासून इगतपुरी तालुक्यातील कावनई किल्ल्यावर स्वातंत्र दिन आणि प्रजासत्ताक दिनाला सर्वात मोठ्या आकाराच्या तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात येते.ही परंपरा आजही अबाधित ठेवण्यात आली असून, ७९ व्या स्वतंत्र दिनी कावनई किल्ल्यावर दिमाखात ध्वजारोहण करण्यात आले.

इगतपुरी तालुक्यातील कावनई हे गाव.स्वातंत्रपूर्व काळात हे तालुक्याचे ठिकाण.या गावाला धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा लाभल्याने जिल्ह्यात नावारुपास आलेले हे गाव.कपिल मुनीचे वास्तव्य, गजानन महाराज यांचे तपोस्थान आदी धार्मिक वारशाबरोबर जवळील शिवकालीन कावनई किल्ला हा आजही ऐतिहासिक खुणा ठेऊन दिमाखात उभा आहे.

सन.१९४७ साली देशात स्वातंत्र्याची मशाल पेटल्यानंतर तत्कालीन शासनाने आदेश काढले की देशातील सर्व ऐतिहासिक किल्ल्यावर राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात यावे. या आदेशाची इगतपुरी महसूल विभागाने स्वातंत्र्यापासून आजपर्यंत काटेकोरपणे अंमलबजावणी केली. आजही या किल्ल्यावर १८ बाय २२ फुट आकाराच्या विशाल राष्ट्रध्वजाचे प्रत्येक स्वातंत्रदिनी आणि प्रजासत्ताक दिनी सन्मानपूर्वक ध्वजारोहण करण्यात येते. विशेष म्हणजे हे ध्वजारोहण शासकीय कर्मचाऱ्याच्या हातून करण्याची परंपरा आजही कायम असून,हा ध्वज उतरविल्यानंतर ध्वजाची घडी घालून हा ध्वज तहसील कार्यालयाच्या कोषागारात जमा करण्यात येतो.विशेष म्हणजे सन.१९४७ पासून हा एकच ध्वज ध्वजारोहणासाठी वापरण्यात येत आहे. ७९वा स्वतंत्रदिनी कावनई किल्ल्यावर झालेल्या ध्वजारोहनास तलाठी जयंत धोंडपकर, ग्रामसेवक अरविंद ठाकरे, कृषी सहाय्यक कोकाटे, गोपाळ पाटील, किरण पाटील, दीपक सिरसाठ, पोलिसपाटील ज्ञानेश्वर सिरसाठ, रामदास बोराडे, किरण पाटील, जेष्ठ नागरिक शिवाजी सिरसाट, कोतवाल भागाजी कौटे, चेअरमन शरद सिरसाठ, रंगनाथ पाटील, पढारी बोराडे, शरद कवटे, किरण रायकर,प्रसाद पाटील, शिवाजी सिरसाट, किरण पाटील,अशोक पाटील, निवृत्ती सिरसाट व ग्रामस्थ उपस्थित होते.

## दरेगाव येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



**चांदवड ।** चांदवड तालुक्यातील दरेगाव येथे ग्रामपंचायत, सोसायटी, माध्यमिक शाळा ,प्राथमिक शाळा, आयुर्वेदिक दवाखाना येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी गावातून प्रभात फेरी काढून देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या.

यावेळी दरेगाव ग्रामपंचायतचे ध्वजपूजन माजी सैनिक रमण गांगुर्डे, ध्वजारोहण सरपंच सरला पवार , सोसायटीचे ध्वजपूजन भाऊसाहेब देवरे, ध्वजारोहण पोलीस दलातील विकास देवरे , विकास माध्यमिक विद्यालयाचे ध्वजपूजन सूर्यकांत गरुड, ध्वजारोहण वाल्मीक देवरे, आयुर्वेदिक दवाखान्याचे ध्वजारोहण माजी सैनिक भिला पगार तर जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेचे ध्वजपूजन माजी सरपंच नथु देवरे व दत्तू पगार तर ध्वजारोहण शालेय व्यवस्थापन समिती सदस्य बाबाजी देवरे यांच्या हस्ते करन्यात आले.सालाबादप्रमाणे गावातील अनिल गव्हाणे यांनी आपल्या स्वर्गीय मातोश्री कै सरुबाई गव्हाणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ इयत्ता 1 ते 7 वि च्या प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या गुणवन्त विद्यार्थ्यांना रोख स्वरूपातचे बक्षीस देऊन गौरव करण्यात आला ,त्याच प्रमाणे मुबई पोलीस मध्ये कार्यरत असणारे दरेगाव चे भूमिपुत्र विकास देवरे व हरितात्या देवरे सदस्य शाळा व्यवस्थापन समिती दरेगाव, यांनी साई श्रद्धा प्रतिष्ठान अंतर्गत जिल्हा परिषद शाळेत शिकत असणाऱ्या इयत्ता १ ली ते ७ वी मधील २५० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३ वह्यांचे वाटप केले . शासकीय आदेशाप्रमाणे विद्यार्थ्यांनी संगीत कवायत सादर केली व खाऊ वाटप करण्यात आला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष साईनाथ देवरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते. कार्यक्रमाचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक छबु गुंजाळ व सुत्रसंचलन साहेबराव देवरे यांनी केले, दिपक निकम् यांनी मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाला सरपंच सरला पवार, उपसरपंच सोमनाथ देवरे, चेअरमन विक्रम गांगुर्डे, नथू देवरे, भाऊसाहेब देवरे, कौतिक जाधव, भाऊसाहेब जाधव, संजय गांगुर्डे, उत्तम गांगुर्डे माधव देवरे, रावसाहेब देवरे, शहाजी देवरे, बाळासाहेब देवरे, ग्रामसेवक भोये, तलाठी पिसोळकर पो. पाटील सोमनाथ गांगुर्डे, विद्यालयाचे मुख्याध्यापक गीते व त्यांचे सर्व शिक्षक व कर्मचारी, हरी देवरे , सागर गांगुर्डे, ज्ञानेश्वर देवरे ,समाधान गांगुर्डे, दत्तू गांगुर्डे,विक्रम पगार, एकनाथ पगार, सोमनाथ देवरे, ग्रामपंचायत सदस्य मंदाबाई पगार,वैशाली देवरे, योगिता गांगुर्डे, ताई वाघ, आरोग्य सेविका ,अंगणवाडी सेविका ,ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाद येथे स्वातंत्र्यदिन



**चांदवड ।** वाद (ता. चांदवड) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भारतीय स्वातंत्र्यदिनाचा सोहळा देशभक्तीच्या वातावरणात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी वाद-वराडी ग्रामपंचायतीचे सरपंच प्रविण आहेर तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खंडू गोरसे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चांदवड कृषी उत्पन्न बाजार समितीचे नवनिर्वाचित उपसभापती पंढरीनाथ खताळ उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा सोहळा संपन्न झाला.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर गीतांवर आधारित संगीत कवायतींनी उपस्थितांचे मन मोहून टाकले. यावेळी इयत्ता पाचवीत शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन करणारी कु.सायली भाऊसाहेब आहेर हिचा सत्कार करून गौरव करण्यात आला. आपल्या प्रभावी वक्तृत्वातून मान्यवरांनी स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व पटवून दिले. ध्वजारोहणानंतर अंमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेण्यात आली. या प्रसंगी गावातील मान्यवर, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. ग्रामीण भागातील मुलांना शाळेच्या माध्यमातून व्यासपीठ मिळत असल्याने त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खंडू गोरसे यांनी शाळेसाठी ४३ इंची एलईडी टीव्ही भेट देऊन शैक्षणिक उपक्रमांना मोलाचा हातभार लावला.

## स्वामी विवेकानंद विद्यालयात शाडू माती कार्यशाळा




**पंचवटी ।** येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात इको–फ्रेंडली गणेशोत्सवाच्या निमित्ताने शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात पार पडली. मराठी व इंग्रजी माध्यमातील शेकडो विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला.

कार्यशाळेत विद्यालयाचे कलाशिक्षक पुंडलिक बागुल यांनी विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने शाडू माती पासून गणेशमूर्ती कशा घडवाव्यात याचे मार्गदर्शन केले. कला विभाग व इको क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी मूर्ती घडवताना त्यामध्ये विविध झाडांच्या बिया रोवून एक आगळा प्रयोग केला. तसेच घरी गणेशाची स्थापना करताना शाडू मातीच्या मूर्तींचाच उपयोग करण्याचे, तसेच आरास करताना थर्माकोल व प्लास्टिक टाळून टाकाऊतून टिकाऊ साहित्य वापरण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांनी दिले. कार्यशाळेस विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर झोटिंग व पर्यवेक्षिका शुभदा टाकले यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडाशिक्षक अरुण जाधव, विनोद बैरागी, योगेश देवरे, संदीप देवरे, प्रदीपसिंग पाटील, संतोष उदार, जीवन गांगोडे, जितेंद्र अहिरे, संदीप जोपळे, ललित शार्दुल, प्रभाकर साबळे, उत्तम गाडे, दिगंबर निकम यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर सहकारी वृंद यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## 'मविप्र'चा समाजदिन समाजाला प्रेरणा देणारा उत्सव

'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून नाशिक जिल्ह्यातील काही समाज सुधारकांनी मराठा विद्या प्रसारक समाज शिक्षण संस्था स्थापन केली. महाराष्ट्रातील काही अग्रगण्य शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेली ही शिक्षण संस्था आहे. या शैक्षणिक संस्थेचा १९ ऑगस्ट हा दिवस समाजदिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. संस्थेच्या दृष्टीने हा महत्वपूर्ण दिवस असतो. संस्थेचे सर्व विद्यार्थी, सर्व सेवक व सर्वसाधारण समाज यांना संस्थेच्या कार्याची ओळख व्हावी, संस्थेचे ऋण व्यक्त करता यावे व संस्थेचे संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्या कार्याचे कृतज्ञता पूर्वक स्मरण व्हावे म्हणून १९८२ पासून कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस १९ ऑगस्ट हा समाज दिन म्हणून साजरा केला जातो. संस्थेच्या सर्व शाखांमध्ये सर्व संस्थापकांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला करून दिली जाते. कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्म १९ ऑगस्ट १८९० रोजी कसबे सुकेने, तालुका निफाड येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव श्रीभाऊ सखाराम पाटील थोरात असे होते. त्यांच्या पत्नीचे नाव पार्वताबाई उर्फ नाणी थोरात असे होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण वणी, तालुका दिंडोरी येथे झाले. नंतरचे शिक्षण सेंट जॉर्ज हायस्कूल, नाशिक येथे झाले. त्यांच्यावर सत्यशोधक समाजाच्या विचारसरणीचा प्रभाव होता. कर्मवीर रावसाहेब थोरात हे संस्थेचे आद्य संस्थापक होय. बहुजन समाजातील शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण पाहून राजर्षी शाहू महाराज थोर समाजसेवक कर्मवीर गणपत दादा मोरे, कर्मवीर कॅप्टन डी. आर. भोसले यांच्याबरोबर समाज जागृतीच्या कार्याने प्रभावित होऊन संस्थेच्या कार्याला त्यांनी स्वतःला वाहून घेतले. जुलै १९१४ मध्ये नाशिक शहरातील राठी भवन इमारतीत वसतिगृह सुरू करून त्यांनी संस्थेचे रोपटे लावले. तेव्हा ते अवघ्या २४ वर्षांचे होते. त्यानंतर अखेरपर्यंत मोलाचे योगदान देत आयुष्यभर संस्थेच्या संगोपन कार्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. ग्रामीण भागात त्यांनी गावोगावी फिरून शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेण्याबाबत पालकांचे मन परिवर्तित केले. ग्रामीण लोकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. १९४१ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना रावसाहेब ही पदवी दिली. संस्थेने त्यांच्या कार्याची माहिती तसेच नव्या पिढीला आदर्श ज्ञात व्हावा, म्हणून केटीएचएम महाविद्यालय नाशिक, माध्यमिक विद्यालय वणी, कनिष्ठ महाविद्यालय मौजे सुकेने, माध्यमिक शाळा मोहाडी आणि संस्थेच्या सभागृहाला त्यांचे नाव दिले गेले. १९८२ पासून त्यांचा जन्मदिन संस्थेतर्फे समाज दिन म्हणून साजरा केला जातो. नाशिक जिल्हा बोर्डाचे ते अध्यक्ष होते. मुंबई प्रांत विधिमंडळात व मुंबई राज्य विधानसभेत आमदार म्हणूनही त्यांनी मोलाचे कार्य केले आहे. १३ मार्च १९५८ ला कोल्हापूर येथे त्यांचे निधन झाले.



'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ब्रीद अंगीकारून तसेच बहुजन सेवा हीच ईश्वर सेवा व मराठा विद्या प्रसारक समाज हाच आपला संसार मानून संस्थेच्या कार्य विस्तारात आणि कार्यप्रशासनात कर्मवीर रावसाहेब थोरात यांच्याबरोबर कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे, पद्मश्री काकासाहेब वाघ, भाऊसाहेब हिरे, गणपत दादा मोरे, डी. आर. भोसले यांचा देखील सिंहाचा वाटा राहिलेला आहे. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवापूर्वी व त्यानंतरच्या दीर्घ कालखंडात संस्थेचे मार्गदर्शक अँड बाबुराव ठाकरे, आधारस्तंभ अँड विठ्ठलराव हांडे यांनी संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळून त्यांच्या कार्याला प्रचंड गती देऊन कार्यविस्तार व विकास केला. त्यानंतर डॉ. वसंतराव पवार यांनी शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीचा अवलंब करत संस्थेच्या गुणवत्ता व कार्य विस्तारात सिंहाचा वाटा उचलून बहुमूल्य योगदान दिले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी १९१४ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी कर्वे आदि महान विभूतींच्या कार्यातून प्रेरणा घेत कर्मवीर रावसाहेब थोरात तसेच इतर कर्मवीरांनी संस्थेची स्थापना केली. संस्थेने आजपर्यंत अनेक गुणवंत विद्यार्थी घडवलेले आहे आणि भविष्यात गुणवंत विद्यार्थी संस्थेच्या माध्यमातून घडत राहतील. मविप्र समाज संस्थेच्या आद्य कर्मवीरांपैकी एक असणारे अर्थातच कर्मवीर रावसाहेब थोरात यांनी संस्थेसाठी अतिशय भरीव योगदान दिले. संस्था स्थापन करण्यापासून ते संस्थेचा विकास त्यांनी घडवून आणलेला आहे. शिक्षण प्रसार हीच देशभक्ती या श्रद्धेने मविप्र समाज संस्था कार्य करत आली आहे आणि करत राहील. स्वतःचे हित बाजूला ठेवून कार्य केलेल्या सर्व समाजधुरीणांना शतशः मानाचा मुजरा.

**- शब्दांकन : सचिन सुरेश गिते (उपशिक्षक) जनता विद्यालय कोमलवाडी, ता. सिन्नर**

## मविप्र कृषी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनी उपक्रम

### विद्यार्थ्यांनी केली अमली पदार्थ सेवन विरोधी प्रतिज्ञा



**नाशिक ।** महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्न, मराठा विद्याह प्रसारक समाज संचलित कर्मयोगी दु. सी.पाटील कृषी महाविद्यालयातस्वातंत्र्य दिन उत्साहात पार पडला. युवकांसमोर असलेल्या अमली पदार्थांच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी जागरूकता म्हणून "अमली पदार्थ सेवन विरोधी" प्रतिज्ञा विद्यार्थिनी स्नेहा जाधव हिने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना दिली.

या सोहळ्यासाठी स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष मदनजी पिंगळे, सदस्य रमेश चिखले, प्राचार्य डॉ. बापूसाहेब भाकरे, प्रभारी प्राचार्य कमलेश भोये, आणि थेटे उपस्थित होते.कृषी महाविद्यालयाच्या स्थलांतरित चाचडगाव येथील प्रशस्त इमारतीच्या प्रांगणातील पहिल्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याचे ध्वजारोहण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब भाकरे यांच्या हस्ते पार पडले. ध्वजारोहणाप्रसंगी राष्ट्रगीत व झेंडागीताने उपस्थित सर्व मान्यवर, विद्यार्थी भारावून गेले. मदन पिंगळे यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्य वीरांचे स्मरण करून आपणही देश विकासात वाटा उचलण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. भाकरे यांनी देशाला मिळालेले स्वातंत्र्य ही आपली महत्त्वाची जबाबदारी असून, प्रत्येकाने आपल्या कृतीमधून विचारातून ती जपली पाहिजे, असे सांगितले. भविष्यातील शेती क्षेत्रातील विविध समस्यांना सामोरे जाताना हे मविप्र कृषी महाविद्यालय उत्तम दर्जाचे कृषी शिक्षण देऊन सक्षम विद्यार्थी घडवत राहील, परिसरातील शेतकऱ्यांसाठी विधायक कार्य करेल, असे सांगितले. प्रा. पी.बी. चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. महाविद्यालयातील विद्यार्थी,प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. कैलास भोईर,प्रा. संदीप सूर्यवंशी, प्रा. चेतन देसले आणि सर्व प्राध्यापक व सेवकवृंद यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका पार पाडली.

## वृद्धांना मायेची ऊब देणारी संस्था : वात्सल्य वृद्धाश्रम






नाशिकमधील वृद्धांसाठी खास व्यवस्था असणारा वात्सल्य वृद्धाश्रम हा सर्वांना सुपरिचित असा आहे. या आश्रमात नाशिकमधील सर्वच दिग्गज नामवंत, हितचिंतक, उद्योजक, कलाकार, पोलीस प्रशासन, सगळ्याच क्षेत्रातील लोक जोडलेले आहेत. अतिशय पारदर्शक आणि आजी-आजोबांना हसवून खेळवून ठेवणारा असा हा वृद्धाश्रम आहे.

याचे संस्थापक अध्यक्ष सतीश सोनार आणि त्यांची संपूर्ण टीम ही नेहमीच आजी आजोबांची येथायोग्य काळजी घेत असतात आणि त्यामुळेच या आश्रमाची वेगळीच ओळख आहे. वृद्धाश्रमात सर्वच उत्सव साजरे केले जातात, सर्वच सेलिब्रेशन देखील केले जातात आणि सर्व स्तरातून समाजातून या ठिकाणी योग्य मदत देखील केली जाते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील 15 ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्य दिनाचा उत्सव कॉलेज रोडवरील गुरुदक्षिणा सभागृहामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी नाशिकचे ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, आपल्या भारताला सुवर्णपदक प्राप्त करून देणारे नाशिकचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश हिरे, पोलीस निरीक्षक अतुल डहाके, सिने कलाकार सिने अभिनेत्री अनिता दाते, सिने अभिनेता धनंजय वाबळे, सुरगाना संस्थांनाचे महाराज रोहितराजे देशमुख पवार, आर्किटेक श्याम लोंढे, महावीर इंटरनॅशनल चे अनिल नहार, उद्योजक अमित कलंत्री, अजय अग्रवाल,पुनीत प्रभूदेसाई, लोकसाक्ष वृत्तवाहिनीचे संचालक सुरेश चव्हाण, डॉ संतोष घेगडमल त्याचप्रमाणे वृद्धाश्रमाला कायमस्वरूपी मदत करणारे देणगीदार असे मान्यवर या कार्यक्रमासाठी लाभलेले होते. दुपारपासून संध्याकाळपर्यंत या ठिकाणी कार्यक्रमांची मेजवानी आजोबांसाठी होती. नाशिक मधील सुप्रसिद्ध सूत्रसंचालक निवेदक संतोष फसाटे यांनी सूत्रसंचालन करून त्यांच्या टीमच्या माध्यमातून गाण्यांच सादरीकरण केलं. त्याचप्रमाणे चिक्की सर यांच्या सायक्लोन डान्स अकॅडमीच्या माध्यमातून नृत्याचा देखील आनंद यावेळेस आजी-आजोबांनी घेतला. दौलतराव पवार यांच्या माध्यमातून फोटोग्राफी ची सेवा देण्यात आली. यानंतर सर्वच मान्यवरांचा सत्कार समारंभ करून सर्व मान्यवरांनी आपली मनोगत देखील व्यक्त केली. सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिता दाते यांनी देखील वात्सल्य वृद्धाश्रमासाठी आम्ही देखील मदत करणार असून आपण सर्वांनी देखील मदत करा असं देखील आव्हान केलं. १५ ऑगस्टच्या या स्वातंत्र्यदिनानिमित्ताने अतिशय मनोरंजनात्मक असा कार्यक्रम याप्रसंगी संपन्न झाला. त्याचप्रमाणे नाशिक मधील प्रसिद्ध मॅजिशियन अभिजीत कन्नडवार यांनी देखील मॅजिक शो करून सगळ्यांचीच मन जिंकली. यावेळी या कार्यक्रमासाठी वात्सल्य वृद्धाश्रमाच्या सर्व टीमने खूप मेहनत घेतली.

# सिव्हिल हॉस्पिटलचा बेजबाबदार कारभार!

## भ्रष्टाचार झाकण्यासाठी माहिती अधिकाराची थट्टा; सीएसच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**नाशिक ।** कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचारामुळे आधीच वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या सिव्हिल हॉस्पिटल मधील आणखी एक गैरप्रकार उघड झाला आहे. रुग्णालयात रुग्णसेवेपेक्षा भ्रष्टाचार, बेजबाबदारी आणि एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप हेच प्राधान्य असल्याचे चित्र सध्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दिसून येत आहे. सर्वात गंभीर बाब म्हणजे माहिती अधिकार कायद्याची उघडउघड पायमल्ली करून जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रकार येथे सुरू आहे.

यापूर्वीच दैनिक 'महासागर'ने एक प्रकरण उघडकीस आणले होते,त्यानुसार १५ जुलै रोजी माहिती अधिकार कार्यकर्ते निशिकांत पगारे यांच्या अपिलाची सुनावणी सिव्हिल सर्जन व अपिलीय अधिकारी डॉ. चारुदत्त शिंदे यांच्या दालनात नियोजित होती. मात्र, स्वतः आदेश देऊनही डॉ. शिंदेच सुनावणीस गैरहजर राहिले, तर अर्जदार वेळेवर उपस्थित होते. त्याआधी दिलेल्या आदेशानुसार,अधिकारी अनुपस्थित राहिल्यास एकतर्फी निर्णय दिला जाईल, असे शिंदे यांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार अर्जदाराच्या उपस्थितीत सुनावणी पार पडली व जनमाहिती अधिकाऱ्याला अर्जदाराला आठ दिवसांच्या आत विनामूल्य संपूर्ण माहिती द्यावी, असा आदेश देण्यात आला. पण धक्कादायक म्हणजे, आदेश देऊनही संबंधित माहिती अद्याप अर्जदाराला मिळालेली नाही. एवढेच नव्हे, तर उलट अर्जदारालाच पुन्हा एकदा अपिलास हजर राहण्याचे पत्र काढून प्रशासनाने कायद्याची सरळसरळ पायमल्ली केल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.




९ ऑगस्ट रोजी "दैनिक महासागर"ला प्रतिक्रिया देताना डॉ. शिंदे यांनी अर्जदार यांनी मागितलेली माहिती आठ दिवसात देण्यात आली नाही, तर संबंधित अधिकाऱ्यावर दंडात्मक कारवाई होईल,असा इशारा दिला होता. परंतु असे असतानाही आजपर्यंत अपीलकर्त्याला माहिती का दिली नाही असा सवाल उपस्थित होत आहे. याप्रकरणी कुणावर दंडात्मक कारवाई झाली का? कि फक्त जनतेची दिशाभूल करण्या साठी दिखावा केला,असा देखील संशय घेतला जात आहे. सिव्हिल हॉस्पिटल प्रशासनाचा भ्रष्टाचार झाकण्यासाठी माहिती अधिकार कायद्याला सरळ बगल दिली जात असल्याचे स्पष्ट दिसते. कधी माहितीच दिली जात नाही, कधी अपूर्ण, तर कधी खोटी किंवा दिशाभूल करणारी माहिती अर्जदाराला पुरवली जाते असा आरोप तक्रारदार यांनी केला आहे. एकीकडे भ्रष्टाचाराचे आरोप टाळण्यासाठी अधिकारी व कर्मचारी एकमेकांवरच जबाबदारी ढकलत आहेत, तर दुसरीकडे जनतेच्या हक्काचा माहितीचा अधिकार अक्षरशः पायदळी तुडवला जात आहे. या बेफिकीर व भ्रष्ट मानसिकतेमुळे माहिती अधिकार कार्यकर्त्यांना अनावश्यक मनस्ताप सहन करावा लागत आहे. दरम्यान, रुग्णसेवेसाठी असलेले हे हॉस्पिटल भ्रष्टाचाराच्या गोंधळात गुरफटल्याने प्रत्यक्ष रुग्णांनाच फटका बसतो आहे. आदेशांचे पालन करण्याऐवजी आदेशांचे चक्क उल्लंघन करणारे अधिकारी जनतेचा विश्वासघात करत आहेत. रुग्णालयातील गैरप्रकारांना जबाबदार असणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर नेमकी कोण कारवाई करणार? आदेश देऊन स्वतःच पाळत नसलेले सिव्हिल सर्जन कायद्याच्या वर आहेत काय? भ्रष्टाचार लपविण्यासाठी माहिती दडवणे हा गंभीर गुन्हा असून, त्याबाबत ठोस आणि तातडीने कारवाई करण्याची मागणी तक्रारदार निशिकांत पगारे यांनी केली आहे.



> सिव्हिल हॉस्पिटल मधील गैरकारभाराची माहिती मिळावी यासाठी माहिती अधिकार कायद्यान्वये सिव्हिल हॉस्पिटलमध्ये अर्ज दाखल केला होता. त्यानुसार माहिती मिळाली नाही म्हणून अपील दाखल केले. अपिलामध्ये अपिलीय अधिकारी डॉ.चारुदत्त शिंदे हे गैरहजर राहिले. मात्र त्यानंतर अपील कर्त्याला संपुर्ण माहिती आठ दिवसात विनामुल्य देण्यात यावी असे आदेश सबंधित जनमाहिती अधिकारी यांना देण्यात आले.असे असताना माहिती मिळण्या ऐवजी सिव्हिल सर्जन चारुदत्त शिंदे यांनी पुन्हा अपीलास हजर राहण्यासाठी पत्र दिले आहे. हा प्रकार हास्यास्पद असून शिंदे यांच्याकडून माहिती अधिकाराची उघड उघड पायमल्ली होत आहे. **- निशिकांत पगारे, अर्जदार व जिल्हाध्यक्ष लोक आंदोलन न्यास**

# देवदर्शन घेऊन परतत असताना ट्रॅक्टर ट्रॉली कोसळून दोन महिला ठार, तेरा भावीक जखमी

**नांदगाव ।** जिल्ह्यांच्या नांदगाव तालुक्यातील जातेगाव पासून सात ते आठ किलोमीटर अंतरावरील श्री पिनाकेश्वर महादेव मंदिर डोंगरावर परवा सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास भाविकांना घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरची ट्रॉली देवदर्शन घेऊन परतत असताना ट्रॅक्टर ट्रॉली २०० फूट खोल दरीत कोसळल्याने दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला असून इतर १३ जण जखमी झाले झाले आहेत. हे सर्वजण ट्रॅक्टरच्या ट्रॉलीत बसून श्री क्षेत्र पिनाकेश्वर महादेवाच्या दर्शनासाठी आले होते. हे सर्व भाविक खामगाव तालुका कन्नड जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील आहेत. दरम्यान चार दिवसात या डोंगरावर अपघाताची ही दुसरी घटना आहे.



कांताबाई नारायण गायके (वय ५५) रा. खामगाव तालुका कन्नड, कमलाबाई शामराव जगदाळे (वय ६२) राहणार जानेफळ या दोन महिलांना डोक्याला व इतर ठिकाणी मार लागल्याने त्यांची प्रकृती गंभीर होती मात्र त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी शासकीय रुग्णालयात नेत असताना रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला. चेतन प्रकाश कवडे, प्रतिभा प्रकाश कवडे, माया प्रकाश कवडे, आप्पा सोपान राऊत, श्रावणी आप्पा राऊत, वर्षा आप्पा राऊत, कल्याणी राजेंद्र कवडे, साई कवडे प्रगती सोमनाथ नवले, हे भाविक जखमी झाले असून त्यांच्यावर बोलठाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून छत्रपती संभाजी नगर येथील घाटी या शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. सदरची घडताच प्रत्यक्षदर्शी भाविक आणि पर्यटकांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तात्काळ खोलदरीत उतरून सर्व जखमींना बाहेर काढून स्वतःच्या वाहनात प्राथमिक आरोग्य केंद्र बोलठाण येथे नेले. घटनेची माहिती मिळताच नांदगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिगंबर भदाणे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी करून बोलठाण येथील उत्कृष्ट चे पोलीस हवालदार भास्कर बस्ते, पोलीस शिपाई परमेश्वर श्रीखंडे, होमगार्ड ऋषिकेश पठाडे, गणेश टिप्पर यांना मार्गदर्शन केले.

# सौदेबाजीच्या वृत्ताची सीईओंकडून दखल; पदोन्नतीस तात्पुरती स्थगिती

**नाशिक ।** जिल्हा परिषदेतील पदोन्नती प्रक्रियेत झालेल्या सौदेबाजीचा मुद्दा आता चांगलाच पेटला असून मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांनी घेतलेल्या कठोर निर्णयामुळे जिल्हा परिषदेतील भ्रष्टाचाराच्या जाळ्याला मोठा धक्का बसला आहे.दै "महासागर" मध्ये या गंभीर प्रकरणाचे वृत्त प्रसिद्ध होताच, जिल्हा परिषदेत एकच खळबळ उडाली. या वृत्ताची गंभीर दखल घेत पवार यांनी काल होणारी पदोन्नती प्रक्रिया तात्काळ रद्द करत सामान्य प्रशासन विभागाला धारेवर धरले.

काल (दि. १८) वरिष्ठ सहाय्यक लिपिक पदावरून कनिष्ठ प्रशासन अधिकारी पदासाठी एकूण आठ कर्मचाऱ्यांचे समुपदेशन होणार होते. मात्र, या पदोन्नती प्रक्रियेत आर्थिक उलाढाल झाल्याचे प्रकरणाला वाचा फुटताच, पवार यांनी कठोर भूमिका घेत प्रक्रियेला आळा घातला. सदर पदोन्नती पूर्णपणे सेवा जेष्ठतेनुसार आणि नियमांचे काटेकोर पालन करून महिना अखेरपर्यंत राबवावी असे आदेश त्यांनी सामान्य प्रशासन विभागाला दिले आहेत. यादीतील पाच




दैनिक महासागर इम्पॅक्ट

नंबरवर असलेले रत्नकर कारभारी शिर्के यांनी यासंदर्भात आक्षेप नोंदवला होता. त्यांच्या मते, आपली सेवा जेष्ठता पाहता त्यांचा क्रमांक दुसरा असायला हवा होता मात्र सामान्य प्रशासन विभागाने संशयास्पदरीत्या पाचव्या क्रमांकावर त्यांचे नाव दाखल केले. काही वेळाने त्यांनी आपला आक्षेप मागे घेतला असला तरी, या प्रकरणामुळे पदोन्नती यादीतील फेरफार व सौदेबाजीच्या चर्चेला उधाण आले. पवार यांच्या निर्णयामुळे जिल्हा परिषदेतील कर्मचारी संघटनांनी सुटकेचा निश्वास टाकला असून, जिल्हा परिषदेत होत असलेल्या गैरप्रकाराला चाप लावण्याचे धाडस दाखविल्याबद्दल त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे स्वागत केले आहे. मात्र, या घटनेनंतर सामान्य प्रशासन विभागातील संबंधित अधिकाऱ्याबाबत प्रचंड संताप व्यक्त केला जात असून, जिल्हा परिषदेत 'त्या' कक्ष अधिकाऱ्याच्या कारभारावर चांगलीच चर्चा रंगली आहे. दरम्यान, या प्रक्रियेत झालेल्या 'अर्थपूर्ण'घडामोडीची चौकशी करण्याची मागणी कर्मचारी संघटनांकडून जोर धरू लागली आहे. फक्त चौकशीच नाही, तर सामान्य प्रशासन विभागात बसलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना तातडीने बाहेर काढावे, अशी ठाम भूमिका कर्मचारी संघटनांनी घेतली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार यांच्या या कठोर भूमिकेमुळे पदोन्नती प्रक्रियेत राजकीय वा आर्थिक हस्तक्षेपाला आळा बसेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या निर्णयामुळे जिल्हा परिषदेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांची झोप उडाली आहे, तर प्रामाणिक कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाची लाट उसळली आहे.

## महत्त्वाचे

### शाडू मातीपासून गणेशमुर्ती निर्मितीची कार्यशाळा भरणार

**नाशिक ।** लायन्स क्बल ऑफ सिन्नर सिटी व सिन्नर नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित, लोकनेचे शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयात बुधवारी (ता.२०) शाडूमातीपासून गणेशमुर्ती निर्मिती कार्यशाळा घेण्यात येणार आहे. यात सुमारे सुमारे २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होण्याची शक्यता आहे. क्लबच्या वतीने विद्यार्थ्यांना माती देण्यात येणार असून गणेश मुर्ती बनवण्याबाबत प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. शहरात अशा प्रकारची प्रथमच मोठी कार्यशाळा होत असल्याची माहिती अध्यक्ष बबन वाजे, सचिव जयवंत काळे, कोषाध्यक्ष प्रशांत शिंदे यांनी दिली. सिन्नर नगरपालिकेचे मुख्य अधिकारी अभिजीत कदम यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी लायन्सचे हेमंत वाजे, डॉं. विजय लोहारकर, डॉं. विष्णू अत्रे, एम. जी. कुलकर्णी, डॉं. भरत गारे, स्टाईसचे उपाध्यक्ष अतुल अग्रवाल, संजय सानप, मनीष गुजराथी, डॉ. प्रशांत गाडे, अपर्णा क्षत्रिय, डॉ. अरुण थोरात व इतर लायन्सचे मेंबर आदी उपस्थित राहणार आहेत. रमेश जगताप यांच्याकडून विद्यार्थ्यांना शाडू माती उपलब्ध होणार आहे. तर कार्यशाळेचे नियोजन वास्तीविशारद सोपान परदेशी यांनी केले आहे. पर्यावरण पूरक गणेशोत्सवासाठी ही कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे अध्यक्ष वाजे, सचिव काळे, कोषाध्यक्षशिंदे सांगितले.

### संभाजी ब्रिगेडच्यावतीने लक्षवेध आंदोलन

**नाशिक ।** संभाजी ब्रिगेडतर्फे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी येत्या २१ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेध आंदोलन करण्यात येणार आहे. राज्यातील शेतकरी अत्यंत हालाकीचे जीवन जगत असून समस्येच्या विळख्यात सापडले आहेत. मराठा, धनगर व आणखी काही समाज बांधव गेल्या अनेक वर्षापासून आरक्षणाच्या मागणीसाठी शासन दरबारी प्रयत्नशील आहेत. याच अनुषंगाने संभाजी ब्रिगेड शासनाला जागे करण्यासाठी राज्यभर लक्षवेध आंदोलन करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून येत्या २१ ऑगस्टला सकाळी ११ ते ४ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेध आंदोलन करण्यात येणार आहे.

### उत्तम गटकळ यांचे निधन

**नाशिक ।** मातेरेवाडी (ता. दिंडोरी) येथील प्रगतिशील शेतकरी व स्वामी समर्थ केंद्राचे ज्येष्ठ सेवेकरी उत्तम नामदेव गटकळ (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे इत्यादी परिवार आहे.



# कमोदनगर येथील बस स्टॅन्ड हरवला झाडा- झुडुपांच्या विळख्यात...



**नाशिक । मुंबई-आग्रा महामार्गावरील कमोदनगर येथील एस.टी. बसस्टॉप झाडा-झुडुपांच्या विळख्यात सापडला आहे. त्यामुळे नागरिकांना बसस्टॉपवर थांबणे जिकिरीचे झाले आहे.**

# अंध विद्यार्थ्यांचा नाशिकमध्ये गुणगौरव संपन्न

**नाशिक ।** ओम साई वेल्फेअर असोसिएशन फॉर द ब्लाइंड अँड डिसेबल्ड आणि लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने अंध विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ दिनांक १७ ऑगस्ट रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बबनराव वाजे उपस्थित होते. हा कार्यक्रम अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी होता.

कार्यक्रमात अंध विद्यार्थ्यांनी स्पष्टपणे सांगितले की, "आम्हाला तुमची फक्त मदत हवी आहे, दया नको." खासदार राजाभाऊ वाजे यांच्याकडून आणि सिन्नरमधील कंपन्यांच्या सीएसआर फंडातून मदत मिळवण्यासाठी सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. अथर्व सानप यांनी दिलेल्या भोजनाच्या वेळी या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर तृप्तीचे भाव दिसले. वाजे यांनी त्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले. ओम सानप यांनीही अतिशय सुंदर भाषण केले. हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमा करिता क्लबचे सचिव जयवंत काळे, उपाध्यक्षा संगीता वाजे, वैशाली सानप व अथर्व (ओम) सानप ओम साई वेल्फेअर असोसिएशन फॉर द ब्लाइंडचे अध्यक्ष विकास शेजवळ व त्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# नवरात्रोत्सव यात्राबाबत सप्तश्रृंगी गडावर आज आढावा बैठक

**सप्तशृंग गड ।** श्री सप्तशृंगी निवासिनी देवी नवरात्रोत्सव यात्रा २२ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर या कालावधीत संपन्न होणार असून भगवतीची यात्रा सुरळीत पार पडावी म्हणून विविध विषयावर चर्चा करण्यासाठी व नियोजीत कामाची तयारी करणे तसेच नवरात्रोत्सव २०२५ चे व आगामी काळात येणाऱ्या कुंभमेळा नियोजन करणे, कायदा व सुव्यवस्था बाबत आढावा घेणेकामी आज (दि. १९) सकाळी ११ वाजता सप्तशृंगी निवासिनी देवी ट्रस्ट कार्यालय येथे अपर जिल्हाधिकारी मालेगांव यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली आहे.



बैठकीस प्रत्येक विभागातील अधिकारी माहितीस्तव स्वतः उपस्थित रहावे, प्रतिनिधी पाठवू नये असे आदेश अप्पर जिल्हाधिकारी यांनी केले. सप्तशृंगी गडावरील रस्त्याचे काम दोन महिन्यापासून बंद पडलेले आहे, रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरलेले आहे. परंतु यात्रोत्सव तीस दिवसांवर येऊन ठेपलेला असतांना यात्रेअगोदर रस्ता ठीक ठाक होईल की नाही ही शंका गावक-यांना व भाविकांना पडलेली आहे. त्यातच धोंड्या कोंड्या विहरीजवळील नाल्याजवळ छोट्या रुंदीचे पाईप टाकण्यात आले असल्याने ते पाईप चोकअप झाल्याने रस्त्यावर पाणी साचुन मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत, वाहन चालकांना व भाविकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे म्हणून त्या ठिकाणी जास्त रुंदीचे पाईप टाकण्यात यावे, ही भाविकांची मागणी आहे.

> सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यामधून दोन ते तीन फुटाचे गज बाहेर काढले असून याचा त्रास एसटी चालकांना व खासगी वाहनधारकांना होत असून या खटकीमुळे यात्रा उत्सव काळात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होऊ शकते यावर त्वरित उपाय करण्यात यावा, तसेच टोल नाक्याजवळील उतारावरील खड्डे बुजविण्यात यावेत, ही आमची मागणी राहणार आहे. **- संदीप बेनके, सप्तशृंगी गड, उपसरपंच**

# महिला महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन



**नाशिकरोड ।** जीवनाला मिळाली अशी ही दवा... पुस्तकांनी दिला श्वास जगण्याला नवा अशा शब्दातून पुस्तकांचे महत्त्व सांगत कवी प्रशांत केंदळे यांनी विविध कविता सादर करत उपस्थित विद्यार्थिनींना मंत्रमुग्ध केले.

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कै.बिंदू रामराव देशमुख कला आणि वाणिज्य महिला महाविद्यालयात मराठी वाङ्.मय मंडळाचे उद्‌घाटन कवी केंदळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. श्री. केंदळे पुढे म्हणाले की, विद्यार्थिनींनी आत्मचरित्र आणि विविध पुस्तके वाचून त्यामधील ज्ञान आत्मसात केले पाहिजे. दिवसभरात घडलेल्या घटना रोजनिशीत लिहिल्या पाहिजे. कोणत्याही विषयावर सातत्याने लिखाण केले पाहिजे. त्यातून लिखाणाचे कौशल्य निर्माण होईल, असे सांगून कवितेची निर्मिती, कवितेचे प्रकार याविषयी त्यांनी माहिती दिली. स्वतःच्या लिखित कविता त्यांनी चालीसह सादर केल्या. 'गुलमोहराचं कुकू,' 'माय,' 'बाप लेकीची कहाणी' यांसह काही निसर्ग कविता सादर करताना कवितेची निर्मिती प्रक्रियादेखील उलगडून सांगितली. अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थिनींनी वाचन, लेखन कौशल्ये विकसित करून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवावे, असे प्राचार्य डॉ.समीर लिंबारे यांनी सांगितले.

# नाशिकला १६ व्या जिमॅस्टिक्स राज्य उद्‍बोधन शिबीर आणि पंच परीक्षेचे आयोजन

**नाशिक ।** महाराष्ट्र हौशी जिमॅस्टिक्स असोसिएशन आणि नाशिक जिल्हा जिमॅस्टिक्स असोसिएशन यांच्यावतीने नाशिकच्या यशवंत व्यायामशाळा येथे जिमॅस्टिक्स या खेळाचे तीन दिवसीय राज्य उदबोधन शिबीर आणि पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.





या शिबिराला मोठ्या उत्साहात सुरवात झाली. या शिबीराचे उदघाटन जिल्हा जिमॅस्टिक्स असोसिशनचे अध्यक्ष शाहू खैरे यांच्या हस्ते आणि राज्य जिमॅस्टिक्स असोशिएशनचे अध्यक्ष संजय शेटे, उपाध्यक्ष महेंद्र चेंबुरकर, सचिव मकरंद जोशी, कार्याध्यक्ष के. सी.जाधव, तांत्रिक समिती सदस्य प्रवीण ढगे तसेच जिल्हा जिमॅस्टिक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष भास्कर कवीश्वर, प्रशिक्षक संदीप शिंदे, प्रभोदन डोणगावंकर, राकेश केदारे, कुमार शिरवाडकर, शेखर सोनवणे, आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रद्धा तळेकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या शिबिरासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून ७६ जनांनी आपला सहभाग नोंदवला आहे. सकाळी आठ ते सायंकाळी सहा असे या शिबिराचे वेळापत्रक असून यामध्ये जिम्नॅस्टिक्स खेळाची संपूर्ण माहिती तोंडी आणि प्रत्यिक्षिकांच्या द्वारे सहभागी शिबिरार्थीना देण्यात येत आहे. पहिले दोन दिवस सहभागी शिबिरार्थीना आंतरराष्ट्रीय पंच आणि प्रशिक्षक तथा शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त आकाश डोंगरे, प्रणाली मांडवकर, भारतीय जिमॅस्टिक्स असोसिएशनच्या तांत्रिक समिती प्रमुख सौ.मांजरी पूर्णपात्रे यांच्याकडून जिमॅस्टिक्स खेळाचे नियम, इतर आवश्यक बाबी, वेळोवेळी नियमात होणारे बदल, खेळाडूंच्या प्रगतीसाठी आवश्यक नवनवीन तंत्रज्ञान या सर्वांची सखोल माहिती आणि प्रात्यक्षिके सादर केली जात आहेत. यानंतर तिसऱ्या दिवशी सहभागी शिबिरार्थी पंच यांच्यासाठी पंच परीक्षा आयोजीत करण्यात येणार आहे. जिमॅस्टिक्स खेळांसाठी आवश्यक सर्व साहित्य आणि तांत्रिक माहिती आणि सूत्रबद्ध प्रशिक्षण खेळाडुंना राज्य असोसिएशन आणि जिल्हा असोसिएशन उपलब्ध करून देत आहे. खेळाडूंनी आपल्या प्रशिक्षकांमार्फत हे सर्व तंत्र अवगत करून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे नावं उज्वल करावे हा या शिबिरामागील मुख्य हेतू आहे असे यावेळी आयोजकांनी सांगितले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षक संदीप शिंदे. प्रभोदन डोणगावकर, राकेश केदारे, कुमार शिरवाडकर आणि त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.

**श्री भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सिन्नर**

**कृष्णाई कॉम्प्लेक्स, गणेशपेठ, अशोकनगर, सिन्नर, नाशिक.**

श्री भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सिन्नर या संस्थेच्या स्वमालकीच्या गणेशपेठ, अशोकनगर, सिन्नर येथील सिटी सर्व्हे नंबर ३५२ या जागेवर कृष्णाई कॉम्प्लेक्स या इमारतीमधील संस्थेचे ग्राऊंड फ्लोअर गाळा नं.४ व ५ क्षेत्र २२.७० चौ.मी. जागा संस्थेस भाडे तत्त्वावर देणे आहे. आवश्यक कागदपत्रांसह संस्थेच्या कार्यालियात भेटण्यास यावे.

हुकूमावरून

**भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सिन्नर**

पोलीसही अत्याचाराच्या घटना जगाने अनेकदा पाहिल्या. मद्याच्या नशेत धुंद असलेल्या पोलिसांचे प्रतापही जगाने पाहिले. कोठडीतील मृत्यू कसे होतात हे देखील समोर आले आहे. पण पोलीस दलातील उच्च पदावर असलेला एक पोलीस अधिकारी एका आंदोलकांच्या कमरेत त्याच्या चिमूरड्याच्या समोर लाथ घालतो, हे चित्र पाहून जर समाजमन विचलित होत नसेल किंवा त्याचं त्यांना काहीच वाटत नसेल, तर याचाच अर्थ ती लाथ जनतेच्याच कमरेत घातली गेली असे समजायला हरकत नाही. पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा ताफा अडवून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने संबंधित आंदोलकाच्या कमरेत कुलकर्णी नावाच्या पोलीस उपाधीक्षकाने फिल्मी स्टाईलने लाथ मारली. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, पण लाथ मारणाऱ्याला तातडीने प्रमोशन दिले की काय केले, याची माहिती मात्र नागरिकांना मिळायला तयार नाही. ती लाथ आंदोलकाच्या कमरेत घातली असली तरी मुर्दाड झालेल्या राज्यातील जनतेच्याच कमरेतच बसली.

स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्री पंकजा मुंडे जालन्यात आल्या होत्या. यावेळी, उपोषणकर्त्यांनी त्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी त्यांना अडवले. आंदोलकांना जसा काही अधिकार असतो, तसा पोलिसांनाही असतो त्याबद्दल दुमत नाही. परंतु त्यानंतर पोलीस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी यांनी संबंधित आंदोलकाच्या कमरेत फिल्मी स्टाईलने लाथ मारली व आपले शौर्य महाराष्ट्राला दाखवून दिले. खरं म्हणजे असा कर्तव्य कठोर अधिकारी नक्षलवादी क्षेत्रात किंवा पाकिस्तानच्या सीमेवर लढायला पाठविला पाहिजे. आता राज्याचे मुख्यमंत्री स्वतः गृहमंत्री आहे. त्यांनी याबाबत आपली भूमिका अजूनही जाहीर केलेली नाही. त्यामुळे कदाचित या कुलकणीर्ला प्रमोशन मिळेल अशी कुत्सित चर्चा राज्यात सुरू झाली आहे. या कुलकर्णी महाशयांनी आंदोलनकर्त्याच्या कमरेत पाठीमागून येऊन लाथ घातली व त्याचा चिमुरडा आपल्या बापाच्या कमरेत बसलेली लाथ हताशपणे पाहत होता हे चित्र महाराष्ट्राला नक्कीच विचलित करणारे ठरले. गुन्हेगारांशी नेहमी हात मिळवणे करणारे, राज्यकर्त्यांपुढे हतबल झालेले व हप्ते खाऊन गब्बर झालेले पोलीस ही प्रतिमा आजही महाराष्ट्रातील पोलिसांची आहे. शूर पोलीस पाहायलाच मिळत नाही. पण कुलकर्णी नावाचा हा शूर पोलीस अधिकारी पाहून महाराष्ट्र मात्र हादरला. जर हा पोलीस अधिकारी एवढाच शूर असेल, तर त्याला बीडमध्ये पाठवून वाल्मीक कराडच्या गँगच्या विरोधात लढाईला पाठविले पाहिजे. तेथील गुन्हेगारांच्या पाठीत मागूनच काय पुढून जरी लाथ मारली तरी कुलकणीर्ला महाराष्ट्र डोक्यावर घेईल.



# जनतेच्या कमरेत बसली 'त्या' पोलिसाची लाथ





जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०


पोलीस किती जातीयवादी, क्रूर, मित्र नसलेले, अक्षम किंवा भ्रष्ट आहेत? हा विषय वारंवार समाजात चर्चिला जातो. चित्रपटांमध्ये देखील 'पोलीससे ना दोस्ती अच्छी, ना दुश्मनी अच्छी' असे संवाद देखील 'फेमस' झालेले आहेत. त्यामुळेच हे मान्य करावे लागेल की, भारतातील लोकसंख्येच्या शक्तीहीन घटकांवरील 'कुलकर्णी छाप' पोलिसांची क्रूरता ही अनेक दशकांपासूनची वास्तवता आहे.

भारत स्वतंत्र राष्ट्र बनण्यापूर्वीही, आणि आताही गरीब आणि शक्तीहीन लोकांवरील पोलिसांची क्रूरता ही वास्तवता आहे. लोकसंख्येच्या वाढत्या संख्येबरोबरच, मर्यादित संसाधने आणि संधींसाठी लोकांमध्ये होणारा संघर्ष आता अनेक पटींनी वाढला आहे.

अशा प्रकारे सार्वजनिक भ्रष्टाचार, चोरी करणे किंवा जबरदस्तीने पैसे मिळवणे, राजकीय प्रभावाचा गैरवापर करणे, धार्मिक भावना इत्यादी प्रकार अनेक पटींनी वाढले आहेत. त्यासोबतच गुन्हेगारांची संख्या आणि सार्वजनिक ठिकाणी गुन्हेगारी कारवायांचे प्रमाणही प्रचंड प्रमाणात वाढले आहे. सुमारे तीस वर्षांपूर्वी अस्तित्वात नसलेली आणखी एक घटना म्हणजे दहशतवाद.

अशा अवस्थेत पोलिसांचे मानसिक संतुलन बिघडू शकते. असे असूनही जालन्यातील 'कुलकर्णी'ने केलेला 'प्रताप' हा मात्र मनाला पटला नाही. पोलीस हा जनतेचा मित्र असतो अशी जाहिरात केली जाते. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे त्यांचे ब्रीद वाक्य देखील मान्य आहे. परंतु असाह्य अवस्थेतील व्यक्तीला त्याच्या मुलादेखत मारहाण करणे हे कितपत योग्य आहे?

उपोषणकर्ता गोपाल चौधरीने जालना पोलिसांवर गंभीर स्वरूपाचे आरोप केले. त्याचे म्हणणे असे आहे की, माझ्या सासरच्यांनी माझ्या पत्नीचं दुसऱ्याशी लग्न लावून दिलं. यामुळे, मी जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. मात्र, पोलीस पैसे खाऊन गुन्हेगारांना पाठीशी घालत आहेत. तसेच, माझ्या वडिलांना चौकशीसाठी बोलावून मारहाण करतात.

या घटनेतही पोलिसांची फौज आमच्याच अंगावर आली. आरोपींना अटक करा आणि न्यायालयात हजर करा इतकीच आरोपीची मागणी होती. न्याय नाही मिळाला तर आत्मदहन करू, असे त्याचे म्हणणे होते. पोलीस उप अधीक्षक अनंत कुलकर्णी यांचे म्हणणे असे की, जालन्यात आत्मदहन करण्याचा प्रयत्न करताना आंदोलकाने महिला कर्मचाऱ्याच्या अंगावर रॉकेल टाकल्याने बळाचा वापर केला.

गेल्या काही दिवसांपासून गोपाल चौधरी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या पत्नीने दुसरे लग्न केल्याने तिला परत आणावे, अशी मागणी ते करत आहे. यापूर्वी पोलिसांनी त्यांना अनेकदा समजावण्याचा प्रयत्न केला, असा कुलकर्णी दावा करीत असले, तरी ताब्यात घेतलेल्या आरोपीला मारहाण करण्याचा अधिकार या कुलकर्णी नावाच्या शूर (?) अधिकाऱ्याला दिला तरी कुणी?

भारतातील समाज सुमारे तीस वर्षांपूर्वीच्या तुलनेत कितीतरी पटीने जास्त अराजक, असंयमी आणि गुन्ह्यांनी भरलेला आहे. एवढ्या मोठ्या, अराजक आणि अराजक समाजाचे कामकाज चालविण्यासाठी, सत्ताधारी राजकीय वर्ग सतत पोलिस दलाकडे पाहतो. गेल्या तीस वर्षांत पोलिस दलात अनेक पट वाढ झाली आहे.

पोलिस दलात आणि वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असली तरी, सार्वजनिक क्षेत्रात गुन्हेगारी, दहशतवाद आणि गोंधळ वाढतच आहे आणि ते अनियंत्रित राहिले आहेत. समाजातील या गोंधळाच्या वाढीवर आणि तत्त्वहीन राजकारण्यांकडून हिंसाचाराला चालना देण्यावर नियंत्रण ठेवण्यात आणि दंगली आणि दहशतवादी हल्ल्यांसारखे मोठे गुन्हे सोडवण्यात अयशस्वी झाल्याने, पोलिस कठोर उपाययोजनांचा अवलंब करतात. पण ताब्यात असलेल्या संशयित आरोपीला पाठीमागून पळत येऊन वेगाने लाथ मारण्यात कोणता पुरुषार्थ कुलकर्णी महाशयांनी साधला ?

अशाप्रकारे गेल्या काही दशकांमध्ये पोलिसांची क्रूरता लक्षणीयरीत्या वाढली आहे. महानगरांमध्येही कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. प्रमुख शहरांमध्येही महिलांवर होणारे अत्याचार, बलात्कार, महिलांवरील गुन्हे वाढले आहेत आणि पोलिस त्यांच्यावर नियंत्रण आणू शकत नाहीत.

सार्वजनिक ठिकाणी, धार्मिक मंडळांमध्ये, धार्मिक स्थळांमध्ये, मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये काही कारवाया नियमितपणे घडतात. या कारवायांसाठी जबाबदार असलेल्या गुन्हेगारांना पकडले जाते हे फार कमी प्रकरणांमध्ये घडते.

पोलिसांची वागणूक क्रूर का असते याचे अनेक पैलू आहेत, हे समाजालाही मान्य आहे. अनेकदा कामाचा ताण, प्रशिक्षण, समाजाचा दबाव आणि काहीवेळा वैयक्तिक स्वभाव यांसारख्या घटकांमुळे पोलिसांची वागणूक क्रूर असू शकते. कामाचा ताण सर्वत्र असतोच. त्यांना २४ तास उपलब्ध राहावे लागते आणि अनेक गुंतागुंतीच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे, काहीवेळा ते चिडचिडे होऊ शकतात आणि त्यांचा राग लोकांवर काढू शकतात.

काहीवेळा पोलिसांना पुरेसे प्रशिक्षण मिळत नाही, ज्यामुळे त्यांना परिस्थिती हाताळण्यात अडचणी येतात. त्यांना लोकांसोबत कसे बोलावे, कसे वागावे याचे योग्य प्रशिक्षण नसल्यास, ते क्रूरपणे वागण्याची शक्यता असते.

समाजातून पोलिसांवर तात्काळ कारवाई करण्याचा आणि गुन्हेगारी रोखण्याचा दबाव असतो. त्यामुळे, काहीवेळा पोलिस कायद्याचे उल्लंघन करून लोकांना शिक्षा देण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे त्यांची वागणूक क्रूर दिसते. काही पोलिसांचा स्वभावच क्रूर असू शकतो. त्यांना लोकांबद्दल सहानुभूती नसते आणि ते आपल्या अधिकाराचा गैरवापर करतात.

काहीवेळा राजकीय दबावामुळे पोलिसांना काही विशिष्ट व्यक्ती किंवा गटांवर अन्यायकारक कारवाई करावी लागते, ज्यामुळे त्यांची प्रतिमा मलिन होते. काहीवेळा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना कठोर भूमिका घ्यावी लागते, ज्यामुळे त्यांची वागणूक क्रूर वाटू शकते.

पोलिसांच्या क्रूर वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांना योग्य प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यांना लोकांसोबत कसे बोलावे, कसे वागावे याचे प्रशिक्षण दिले पाहीजे. पोलिसांवरील कामाचा ताण कमी करणे आवश्यक आहे. त्यांच्यासाठी कामाचे तास निश्चित करणे आणि त्यांना विश्रांतीसाठी पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. पोलिसांच्या वर्तनावर लक्ष ठेवण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा असावी. त्यांच्या गैरवर्तनाबद्दल तक्रार करण्याची सोय असावी.

समाजात कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे आवश्यक आहे. लोकांना त्यांच्या अधिकारांबद्दल आणि कायद्याबद्दल जागरूक करणे आवश्यक आहे. पोलिसांची वागणूक क्रूर असण्याची अनेक कारणे आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी, एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. विविध पक्षांकडून पोलिसांना तात्काळ समाधानकारक निकाल देण्याची सक्ती केली जाते, ज्यामुळे अधिकारी त्यांच्या अधिकाराचा अतिरेक करतात आणि त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून क्रूरपणे वागतात.

पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपीला पोलिस ज्या पध्दतीने वागवतात, त्यामुळे पोलिसांची प्रतिमा अतिशय मलीन झालेली आहे. त्यांना लोक हरामखोर, भिकारी, वर्दीतील गुंड असे म्हणतात. लोकांच्या अश्या प्रतिक्रिया बघुन वाईटही वाटते. कारण कायद्याच्या रक्षकाला त्याच्याच खात्यातील काही लोकांमुळे मान खाली घालावी लागते.

## सोमनाथ सूर्यवंशींची आठवण झाली

समाजमाध्यमामध्ये ताब्यात घेतलेल्या आरोपीला पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी घेवून निघाले अन् मागच्या बाजूने पळत पळत येवून त्याच्या कमरेत लाथ घालणारा पोलिस उप अधीक्षक दर्जाचा अधिकारी हा प्रकार पाहून महाराष्ट्र हादरला. विशेष म्हणजे अजूनही 'त्या' अधिकाऱ्याची साधी चौकशी देखील झाले नसल्याचे वृत्त आहे. तसे जर असेल तर गृह खात्याचा कारभार कसा चालू आहे याचा अंदाज करायला हरकत नाही. या अशा घटनांमुळेच सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाची आठवण संपूर्ण महाराष्ट्राला झाली. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीतील मृत्यू प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्याच्या पोलीस महासंचालकांना विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. याचाच अर्थ असा की यापूर्वी पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाची फाईल वासनात गुंडाळून ठेवली होती. या आदेशामुळे महाराष्ट्र सरकारने यापूर्वी नियुक्त केलेली चौकशी समिती बरखास्त झाली. न्यायालयाच्या आदेशानुसार कोठडीतील मृत्यूशी संबंधित सर्व कागदपत्रे नव्याने स्थापन होणाऱ्या विशेष तपास पथकाकडे सोपवल्याने त्या प्रकरणातही असाच कुणीतरी 'कुलकर्णी' सापडल्याशिवाय राहणार नाही. या प्रकरणातील याचिकाकर्त्या विजयाबाई सूर्यवंशी यांच्यावतीने ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी प्रखर युक्तिवाद केला. परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीचे विद्रुपीकरण झाल्यानंतर शहरात बंद पुकारण्यात आला होता. त्या दरम्यान काही आंदोलकांनी तोडफोड केली. पोलिसांनी तोडफोडीत सहभागी झाल्याच्या संशयावरुन सोमनाथ सूर्यवंशींना अटक केली व पोलीस कोठडीत त्यांचा मृत्यू झाला होता. संबंधित पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याचा हायकोटार्चा आदेश सुप्रीम कोर्टानंही कायम ठेवला आहे. समाज माध्यमांमध्ये 'कुलकर्णी'चा पराक्रम संपूर्ण देशाने पाहिला, नाहीतर अजून एक सोमनाथ सूर्यवंशी प्रकरण झाले असते तरी नवल वाटले नसते!

# कॉंग्रेसमधील अंतर्गत लोकशाहीचे काय?

कर्नाटकातील कॉंग्रेसचे नेते आणि सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांनी कॉंग्रेसला घरचा आहेर दिला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बंगळुरू (मध्य) लोकसभा मतदारसंघातील, महादेवपुरा विधानसभा मतदार क्षेत्रात एक लाख दोनशे पन्नास मतांची चोरी झाल्याचा आरोप नुकताच कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केला होता.

बंगळूरू (मध्य) लोकसभा मतदारसंघातील इतर विधानसभा क्षेत्रांत कॉंग्रेसच्या उमेदवाराला आघाडी मिळाली होती, परंतु महादेवपुरा विधानसभा क्षेत्रात प्रतिस्पर्धी भाजपा उमेदवाराला एक लाख चौदा हजार इतके प्रचंड मताधिक्य मिळाल्याने, इतर विधानसभा क्षेत्रांत आघाडीवर असूनही, कॉंग्रेसच्या उमेदवाराला बंगळूरु (मध्य) लोकसभा मतदारसंघात पराभव पत्करावा लागला, असा आरोप राहुल गांधी यांनी केला होता.

यावर आपले मत व्यक्त करताना, कर्नाटकचे सहकार मंत्री के. एन. राजन्ना यांनी सांगितले की लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान कर्नाटकात आमचे (कॉंग्रेसचे) सरकार सत्तेवर होते. त्यामुळे मतदार याद्यांकडे व्यवस्थित लक्ष देणे ही आमची जबाबदारी होती. मतदार याद्यांतील अनियमितता आमच्या डोळ्यांसमोर दिसत होती.आम्ही त्यावेळी त्याबाबत आक्षेप घ्यायला हवा होता पण आम्ही डोळे मिटून शांत राहिलो. आता आक्षेप नोंदवण्याऐवजी तेंव्हा आक्षेप नोंदवला असता तर बरे झाले असते.




अभय गोखले


कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी हे मत चोरी बाबत निवडणुक आयोग आणि भाजपा यांच्यावर आरोप करत असताना आणि संपूर्ण देश ढवळून काढत असताना, त्यांच्या पक्षाची सत्ता असलेल्या कर्नाटक राज्यातील एक मंत्री अशा प्रकारचे वक्तव्य करून, राहुल गांधी यांना अडचणीत आणत असेल तर ती गोष्ट कॉंग्रेसचे नेतृत्व सहन करणे शक्यच नव्हते. कॉंग्रेस नेतृत्वाने कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना असा आदेश दिला की राजन्ना यांची ताबडतोब मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी.

बिचारे, सिद्दरामय्या ! त्यांनी कॉंग्रेस नेतृत्वाला सांगून पाहिले की विधानसभेचे अधिवेशन सुरू असल्याने, आता राजन्ना यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी केली तर विरोधी पक्षांच्या हाती आयतेच कोलीत मिळेल, परंतु कॉंग्रेस नेतृत्व आपल्या म्हणण्यावर ठाम राहिल्याने अखेर सिद्धरामय्या यांना नेतृत्वाचे ऐकावे लागले. कारण राजन्ना यांचा अपराध मोठा होता.त्यांनी अशाप्रकारचे वक्तव्य करून राहुल गांधी यांना अडचणीत आणले होते.

अर्थात आपल्या पक्षाला अडचणीत आणण्याचा प्रताप, राजन्ना यांनी पहिल्यांदाच केलेला नाही. राजन्ना हे वाल्मिकी समाजातून येतात. ते मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांच्या अगदी निकटचे मानले जातात. मुख्यमंत्री सिद्दरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांच्यातील संघर्षात, राजन्ना हे सिद्दरामय्या यांची उघडपणे बाजू घेतात. मध्यंतरी त्यांनी जाहीर केले की सिद्दरामय्या हे पूर्ण टर्म मुख्यमंत्रीपदी राहतील. मुख्यमंत्रीपदावरून सिद्दरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी के शिवकुमार यांच्यात रस्सीखेच सुरू असताना, राजन्ना यांचे वरील वक्तव्य कॉंग्रेस नेतृत्वाला अडचणीत आणणारे होते.

कॉंग्रेसच्या धोरणानुसार, 'एक व्यक्ती एक पद' याला अनुसरून उपमुख्यमंत्रीपद आणि प्रदेशाध्यक्षपद ही दोन पदे सांभाळणाऱ्या डी के शिवकुमार यांच्याकडून प्रदेशाध्यक्षपद काढून घेऊन ते दुसऱ्या व्यक्तीकडे सोपविण्यात यावे अशी मागणी मध्यंतरी राजन्ना यांनी केली होती.

खरे पाहता मुख्यमंत्रीपदावर दावा करणाऱ्या डी के शिवकुमार यांना खूष ठेवण्यासाठी कॉंग्रेस नेतृत्वाने त्यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद आणि प्रदेशाध्यक्षपद ही दोन पदे आपले धोरण बाजूला ठेवून, सोपवली होती.परंतु राजन्ना यांच्या वरील मागणीमुळे कॉंग्रेस नेतृत्वाची पंचाईत झाली होती.

डी के शिवकुमार यांची बाजू कमकुवत करण्यासाठी मध्यंतरी, राजन्ना यांनी अशी मागणी केली होती की, लिंगायत, अनुसूचित जाती आणि जमाती व अल्पसंख्य समाजातील एकेका व्यक्ती ला उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे. याचा अर्थ डी के शिवकुमार यांच्या व्यतिरिक्त आणखी तिघांची उपमुख्यमंत्रीपदी वर्णी लावण्यात यावी.


सप्टेंबर नंतर राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याचे भविष्य वर्तवून राजन्ना यांनी काही दिवसांपूर्वी मोठ्या प्रमाणात खळबळ माजवली होती.राज्याच्या मुख्यमंत्री पदात बदल होण्याचे संकेत राजन्ना यांनी त्यावेळी दिले होते.

कॉंग्रेस नेतृत्वाने मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना, तडकाफडकी राजन्ना यांची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करण्याचे आदेश दिले,त्यांना राजीनामा देण्यासाठी पुरेसा वेळही दिला नाही. यावरून राजन्ना यांचा अपराध किती मोठा होता, याची कल्पना येते.

लोकशाही वाचवण्यासाठी कॉंग्रेसतर्फे देशभर आंदोलन करण्यात येत आहे. मात्र कॉंग्रेस मधील अंतर्गत लोकशाहीचे काय, असा प्रश्न राजन्ना प्रकरणावरून उपस्थित होतो. खरे पाहता, कॉंग्रेस नेतृत्वाने राजन्ना यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यायला हवी होती. ते चुकीचे बोलले असतील तर त्यांचे म्हणणे खोडून काढायला हवे होते. परंतु तसे न करता,त्यांची तडकाफडकी मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याचे आदेश कॉंग्रेस नेतृत्वाने, मुख्यमंत्री सिद्दरामय्या यांना दिले.

राजन्ना हे सिद्दरामय्या यांच्या अगदी निकटचे तर आहेतच शिवाय ते मासबेस असलेले नेते आहेत.लवकरच कर्नाटकात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. राजन्ना यांच्या हकालपट्टीमुळे त्यांच्या प्रभावक्षेत्रात, कॉंग्रेसला फटका बसू शकतो, ही गोष्ट लक्षात घेता, कॉंग्रेस नेतृत्वाला, राजन्ना यांचे प्रकरण अतिशय काळजीपूर्वक हाताळावे लागेल. ■ ■






# अण्णा आता तरी उठा!

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे आंदोलनासाठी ओळखले जातात. अशातच पुण्यात अण्णा हजारे यांचा फोटो असलेला एक बॅनर लावण्यात आला आहे. यावर आता तरी उठा अण्णा, मतांची चोरी झाली आहे, असा मजकूल लिहिलेला आहे.

अण्णांना याद्वारे आंदोलन करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र या बॅनरवरून अण्णा हजारे भडकले आहेत. वयाच्या ९० व्या वर्षीही काम करावं का? असा प्रतिप्रश्न अण्णांनी केला आहे.

पुण्यातील या बॅनरबाबत अण्णा हजारे यांना प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना अण्णा म्हणाले की, आतापर्यंत मी भरपूर काम केले आहे. भ्रष्टाचार होऊ नये यासाठी आंदोलने केली आहेत. माझ्यामुळे या देशात दहा कायदे झाले. माहितीच्या अधिकाराचा कायदा माझ्यामुळे मिळाला. देशात मोठ्या प्रमाणात जागृती झाली. माहितीचा अधिकार, दप्तर दिरंगाई, बदलीचा कायदा, लोकपाल, लोकायुक्त असे कायदे माझ्या प्रयत्नांमुळे अस्तित्वात आले आहेत.

पुढे बोलताना अण्णा म्हणाले की, आता माझं वय झालं आहे. मी ९० वर्षांचा झाल्यानंतरही काम करायचे आणि तुम्ही झोपून राहायचे? अशी जर कोणी अपेक्षा करत असेल तर ते चूकीचे आहे. माझ्याकडे बोट दाखविण्यापेक्षा मागच्या काळात मी जे केले ते आजच्या तरुणांनी करावे असं विधान अण्णा यांनी बॅनर लावणाऱ्यांना केलं आहे.

**तरुणांनी आता जागं व्हायला हवं**

तरुणांना सल्ला देताना अण्णा म्हणाले की, आजपर्यंत मी जे केलं, ते आता तरुणांनी करावं. त्यांचं या देशाप्रती कर्तव्य आहे. कारण तेही या देशाचे नागरिक आहेत. फक्त बोट दाखवून हे करा, ते करा म्हणणं चुकीचं आहे. यातून काहीही साध्य होणार नाही. तरुणांनी आता जागं व्हायला हवं असं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे. दरम्यान, अण्णा हजारे यांनी दिल्लीत २०१२ साली लोकपाल विधेयकासाठी आंदोलन केलं होतं. मात्र त्यानंतर ते आंदोलनांपासून दूर आहेत. ■ ■ ■

## महाराणा प्रताप यांच्या ऐतिहासिक वास्तूंना ऊर्जितावस्था येणार

**वाचक लिहितात**

ही बातमी वाचून एक भारतीय नागरिक म्हणून खुप आनंद झाला. उदयपूर जिल्ह्यातील चावंड या गावात सम्राट महाराणा प्रताप यांची समाधी आहे.

या समाधीचा जिर्णोद्धार वर्ष १९९७ मध्ये तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी बिहारी वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आला.त्यानंतर आजपर्यंत गेल्या २८ वर्षे भारत वा राज्य सरकार कडून समाधीस्थळाची देखरेख व जतन करणे यावर कांहीच खर्च करण्यात आला नाही.

सध्याचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या शासनाने प्रताप सर्किट अभियानांतर्गत महाराणा प्रताप यांच्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रथम २०० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली असून पैकी २० कोटी रुपये चावंडांच्या समाधीस्थळासाठी करण्यासाठी आली आहे.चावंड येथील स्थानिक समिती समाधी संभाळण्याचा प्रयत्न करीत आहे. यासाठी राज्य सरकार कौतुकास पात्र आहे.

उदयपूर जिल्ह्यातील राजसमंदझ जिल्ह्यातील कुंभलगड किल्ला हा महाराणा प्रताप यांचे जन्मस्थान आहे. कुंभलगड किल्ल्याची भिंत जगातील दुसऱ्या नंबरची सर्वात लांब भिंत आहे. पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे ह्या किल्ल्याच्या भिंतीची दुर्दशा झाली आहे.

स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत महाराणा प्रताप यांच्या किल्ल्याची आणि ऐतिहासिक वास्तूंची स्थिती खालावत चालली आहे. देशात अशा कितीतरी वास्तू आहेत पण त्याकडे पुरातत्त्व विभागाचे आणि सरकारचे लक्षच नाही.

म्हणजे इस्लामिक वास्तुंच्या देखरेख व जतन वर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यापेक्षाही महाराणा प्रतापांच्या वास्तूंचे जतन व देखरेख करून ते सुस्थितीत ठेवणे कमी महत्वाचे आहे का? हा प्रश्न एक भारतीय नागरिक म्हणून मला पडतो.

देशातील किल्ले, गडकोट पूर्वीच्या शासकांची प्रतीके, राजवाडे हे या देशातील धरोहर आहे. पुढच्या पिढीला आपला दैदिप्यमान इतिहास दाखवायचा असेल तर यांचे जतन करणे गरजेचे आहे.

परंतु याच गोष्टीकडे नेमके दुर्लक्ष केल्या जाते. सरकारे बदलतात पण मानसिकता बदलत नाही. पण आता सुरुवात झाली आहे हेही नसे थोडके.

■ शशिकांत पाध्ये, वर्धा



# तुम्हीही खाता शिळी चपाती? फायदे आणि तोटे जाणून घ्या

भारतीय घरांमध्ये लोक सकाळच्या नाश्त्यात किंवा संध्याकाळच्या चहासोबत शिळी चपाती आवर्जून खातात. ग्रामीण भागात शिळी चपाती अगदी आवडीने खाल्ली जाते. काही लोकांचा असा विश्वास आहे की शिळी चपाती खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात. त्याच वेळी, काही लोक म्हणतात की शिळी चपाती प्रत्येकासाठी फायदेशीर नसते.

आरोग्य तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की शिळ्या चपातीच्या फायद्यांसोबतच त्याचे काही तोटे देखील आहेत. जसे की ती योग्य पद्धतीने न खाणे, किंवा बरेच दिवस शिळी चपाती खात राहणे किंवा चुकीच्या वेळी खाणे. म्हणून जर तुम्हीही शिळी चपाती खात असाल तर हा लेख तुमच्यासाठी आहे.

आहारतज्ज्ञ शिखा गुप्ता म्हणतात की, आयुर्वेद असो किंवा वैद्यकीय शास्त्र, दोन्हीही म्हणतात की अन्न नेहमीच ताजे खावे. जेव्हा तुम्ही अन्न शिजवून बाहेर ठेवता किंवा काही काळासाठी ठेवता तेव्हा ते शिळे होऊ लागते.

अशा परिस्थितीत हवेत असलेले बॅक्टेरिया, बुरशी अन्नाला दूषित करतात. चपातीच्या बाबतीतही असेच आहे. हवेत असलेले हे बॅक्टेरिया हळूहळू चपातीच्या आत जातात आणि जेव्हा तुम्ही शिळी चपाती खाता तेव्हा त्याचे फायदे कमी आणि नुकसान जास्त होते.

पण १ ते २ दिवस शीळी चपाती खाल्ल्याने तुम्ही आजारी पडणार नाही. पण जर तुम्ही दररोज शिळी चपाती खात असाल तर मात्र याचा आरोग्यावर नक्कीच परिणाम करेल.

**शिळी चपाती खाण्याचे फायदे**

आयुर्वेदात, शिळी चपाती खाण्याचे फायदेही सांगितले गेले आहेत. असे म्हटले जाते की शिळी चपाती खाल्ल्याने रक्तातील साखर नियंत्रित राहते. त्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते.

पोटाच्या समस्या असलेल्या लोकांसाठीही शिळी चपाती खाणे फायदेशीर आहे. त्यामुळे पोटात जळजळ, आम्लपित्त आणि आंबटपणा यापासून आराम मिळतो. शिळी रोटीमध्ये भरपूर फायबर असते, त्यामुळे वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठीही ती फायदेशीर आहे.

**शिळी चपाती खाण्याचे तोटे**

आहारतज्ज्ञांनी सांगितल्याप्रमाणे, शिळ्या चपातीमध्ये बुरशीजन्य आणि बॅक्टेरिया वाढण्याचा धोका जास्त असतो.

अशा परिस्थितीत त्याचा आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. शिळी चपाती खाल्ल्याने अन्नातून विषबाधा होण्याचा धोका असतो. याशिवाय पोटदुखी, उलट्या आणि पचनाशी संबंधित समस्या देखील उद्भवतात. ■ ■ ■

**अशोकायन**


प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)




## सप्तर्षी परिक्रमा

मेहकर परिसरातील
सप्तरुषींच्या स्थळांची
आहे वेगळीच महती
भेट देऊन तर पहा
येईल तुम्हा अनुभूती...

अध्यात्मिक शक्तिंची केंद्रे
आहे ही तपस्वींची तपोभूमी
हजारो भाविक करती परिक्रमा
उर्जाशक्तिची राहत नाही कमी..

दऱ्या खोऱ्यातील श्रावणी दृश्य
नयनांची फेडती पारणे
शारंगधराची घेता भेट
जीवनी राहत नाही काही उणे!

## महत्त्वाचे

### चला लेखणी उचलू या... पुस्तकाचा दिमाखदार प्रकाशन सोहळा संपन्न

**नाशिक ।** वाचनातून घडलो आणि त्यामुळेच ६३ व्या वर्षीही सक्रिय आहे. कारण त्याकाळी



तेवढे सकस लिहिले जात असे. आता त्यासाठी नव्या पिढीला मार्गदर्शन करावे लागणार आहे. त्या दृष्टीने प्रा.गिरीश पाटील यांचे 'चला लेखणी ऊचलुया' हे पुस्तक निश्चितच मैलाचा दगड ठरू शकेल, असा विश्वास प्रा. दत्तात्रय बच्छाव यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी बच्छाव क्लासेस चे संचालक प्रा. दत्तात्रय बच्छाव होते तन्मय प्रकाशनचे संचालक ब्रीजकुमार परिहार व्यासपिठावर उपस्थित होते.
 माझे वडील गावी शेती सांभाळून वाचनालयाचे काम सांभाळायचं . त्यामुळे वाचन कला मला घरातून मिळाली.पुस्तक माणसाला घडवितात. चांगली पुस्तक चांगली माणसे घडवितात. चांगली पुस्तक देखील लिहिली गेली पाहिजे. त्यासाठी डॉ.गिरीश पाटील यांनी लिहिलेले पुस्तक समाजासाठी उपयोगी पडेल." असे सांगून इतिहासिक पुस्तकांचे अनेक अनुभव प्रा. दत्तात्रय बच्छाव शेयर केले.ते डॉ.गिरीश पाटील यांच्या '' चला लेखणी उचलूया " पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात मार्गदर्शन करत होते. तन्मय प्रकाशन चे संचालक ब्रिजकुमार परिहार यांनी आपले विचार मांडलेआधुनिक युगात तंत्रज्ञान विकसित झाले. चॅट जीपीटी आहे, पण मानवी संवेदना या लेखनातून येतील.त्या दृष्टीने पुढील लेखन झाले पाहिजे.असे मत व्यक्त केले. डॉ. गिरीश पाटील यांच्या पुस्तकाचा विषय आवडला म्हणून मी पुस्तक हाती घेतले, असे सांगून डॉ. गिरीश पाटील यांना शुभेच्छा दिल्यात.

### मराठा उद्योजक सेवा संस्था मविप्रच्या गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**नाशिक ।** येथील मराठा उद्योजक सेवा संस्थेतर्फे मविप्रच्या गंगापूर रोडवरील राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक महाविद्यालयातील गरीब व गरजू १० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे संस्थेचे अध्यक्ष महेंद्र बच्छाव, सचिव संजय ठाकरे, खजिनदार ओंकार महाले यांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे आणि प्राचार्य प्रशांत पाटील यांच्याकडे दीड लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. या कार्यक्रमाप्रसंगी मराठा उद्योजक सेवा संस्थेचे पदाधिकारी सागर बोंडे, सुनील पाटील,



श्याम जगताप, हंसराज देशमुख, प्रदीप भदाणे, विकास बच्छाव, कमलेश उशीर, दीपक चव्हाण, रोहित आडके आणि इतर सभासद उपस्थित होते. आर्थिक परिस्थितीमुळे गरीब होतकरू मुलांचे शिक्षण थांबू नये, याकरिता महाविद्यालयाची फी भरण्यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात आली. एकूण १० विद्यार्थ्यांना प्रत्येकी १५ हजार अशी एकूण १ लाख ५० हजार रुपये एवढी रक्कम शिष्यवृत्ती म्हणून वितरित करण्यात आली. ही शिष्यवृत्ती मुलांचे पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत देण्यात येणार असून, या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे पदवीचे शिक्षण पूर्ण करण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे गरीब शेतकरी कुटुंबातील होतकरू मुलांना शिक्षणासाठी मदत होईल आणि त्यांचे भविष्य उज्वल होईल, याची ग्वाही संस्थेचे संचालक ॲड.लक्ष्मण लांडगे यांनी दिली.

### स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला वीर जवानांसह कुटुंबीयांचा सत्कार

**लासलगाव ।** मिशन सिन्दुरचे अभूतपूर्व यश आणि १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन निमित्त, देशसेवेत कार्यरत असलेले शूर वीर जवान व त्यांच्या कुटुंबियांचा सन्मान भाजपा लासलगाव मंडलतर्फे, मंडल सरचिटणीस निलेश अरुण



जगताप यांच्या आयोजनात संत ज्ञानेश्वर माऊली मंदिर येथे करण्यात आला. हा कार्यक्रम दि. १४ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता पार पडला. या प्रसंगी गोकुळ धोंडीराम तांबे यांच्या वतीने त्यांची पत्नी, भाऊराव मधुकर झाल्टे स्वतः सुट्टीवर असल्याने लाभले. सूरज पवार यांच्यावतीने त्यांच्या आई, रहेमान राजमहंमद शेख यांच्या वतीने आई, वडील व पत्नी, आकाश कदम यांच्या वतीने आई, मंडलिक यांच्या वतीने त्यांची पत्नी या सर्वांचा सन्मान करण्यात आला. दरम्यान, भाऊराव झाल्टे यांनी मिशन सिन्दुर दरम्यान उरी-पुंछ येथे कार्यरत असताना आलेले सत्य अनुभव कथन केले. त्यांच्या कथनादरम्यान उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले. कार्यक्रमास भाजपा महिला नाशिक उत्तर जिल्हा महामंत्री स्मिता कुलकर्णी, डॉ. संगीता सुरसे, डॉ. युवराज पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच आरोग्य सेविका सिंधू जाधव, संगिता गरुड व सपना साताळकर यांचाही सन्मान करण्यात आला.

# चौथ्या श्रावण सोमवारी शिवभक्तांनी फुलले शिवालय!









**आडगाव ।** पवित्र श्रावण महिन्यातील चौथ्या सोमवारी आडगाव परिसरातील शिवालये शिवभक्तांच्या गर्दीने फुलली होती. नाशिकमधील नाशिक मनपाच्या हद्दीत असलेल्या आडगाव येथील असलेल्या पुरातन काळातील. मृत्युंजय महादेव मंदिर आणि नीलकंठेश्वर महादेव या दोन्ही मंदिर मध्ये पहिल्या श्रावण मासापासून तर शेवटच्या श्रावण सोमवार पर्यंत. दररोज हजारो भाविक दर्शनासाठी या मंदिरात येत असतात आणि प्रत्येक सोमवारी विविध पूजा. शिवधार्मिक पारायण. कथा. अभिषेक. आरती व दैनंदिन कार्यक्रम आयोजित करत असतात. या मंदिरात गावातील तसेच बाहेर गावातील इतर परिसरातील भाविक महिला. पूजा करण्यासाठी व दर्शनासाठी मोठया संख्येने. सकाळी ४ वाजेपासून तर रात्री १२ वाजेपर्यंत दर्शनाचा लाभ घेण्यासाठी येतात..

## अभ्यासातील सातत्य, नियोजन, एकाग्रतेने कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होणे शक्य : ऐश्वर्या जाधव





**नाशिक ।** केंद्रीय लोकसेवा आयोग अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा जर उत्तीर्ण व्हायचे असेल तर कठोर परिश्रम आणि प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे असते. तुमच्यातील स्वयंशिस्त महत्वाची असून सातत्य, नियोजन आणि एकाग्रतेने लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होता येते असे प्रतिपादन नुकत्याच 2024 मध्ये झालेल्या भारतीय महसूल सेवा परीक्षा उत्तीर्ण ऐश्वर्या मिलिंद जाधव(IRS) हिने केले.

मविप्र संस्थेच्या रावसाहेब थोरात सभागृहात केटीएचएम महाविद्यालयाच्या वतीने तिच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मविप्रचे नाशिक ग्रामीण संचालक रमेश आबा पिंगळे अध्यक्षस्थानी होते. शिक्षणाधिकारी डॉ. विलास देशमुख,शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, प्राचार्य डॉ. एस एस काळे,मविप्र सभासद मिलिंद जाधव, उपप्राचार्य डॉ. कल्पना अहिरे, डॉ. व्ही. बी. बोरस्ते, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एन डी गायकवाड उपस्थित होते. माहिती व ज्ञानाने परिपूर्ण होण्यासाठी वर्तमानपत्रातील महत्त्वाच्या बातम्या, संपादकीय व लेख वाचन करणे आवश्यक असल्याचे सांगून ध्येय निश्चिती देखील महत्वाची असते. केंद्रीय लोकसेवा आयोगाची प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यास तुम्ही तुम्हाला दोन पर्याय नोकरीच्या दृष्टीने उपलब्ध होतात. भारतीय नागरी सेवा अथवा भारतीय वन सेवा यामध्ये तुम्ही काम करू शकतात. या परीक्षांच्या जुन्या प्रश्नपत्रिका सोडवणे, योगा करणे, छंद जोपासणे यादेखील गोष्टी या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी महत्त्वाच्या असल्याचे ऐश्वर्या जाधव हिने सांगितले. विद्यार्थ्यांचे पालक विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने जागरूक आहेत. विद्यार्थ्यांना जीवनाची दिशा आणि उद्दिष्ट ठरविण्यासाठी या कार्यक्रमातून प्रेरणादायी यशाची मांडणी होणार आहे. शिक्षणाचा उद्देश माणसाला घडवणे, त्याला मोठे करणे असल्याचे शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणासाठी केटीएचएम महाविद्यालय विविध कार्यक्रमांचे आयोजन करत असते. यामध्ये विविध मान्यवरांची व्याख्याने, विविध स्पर्धा, विद्यापीठ कार्यक्रम सातत्याने होत असतात विद्यार्थ्यांनी आपला स्क्रीन टाईम कमी करून स्पर्धा परीक्षांकडेही गांभीर्याने बघावे,असे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये भाग घेऊन अभ्यास करून उत्तीर्ण व्हावे,असे मविप्र नाशिक ग्रामीण संचालक रमेश आबा पिंगळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी प्रास्ताविक व प्रमुख पाहुणे परिचय शिक्षणाधिकारी डॉ.विलास देशमुख यांनी केला. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा संदर्भात विचारलेल्या विविध प्रश्नांना ऐश्वर्या जाधव यांनी समाधानकारक उत्तरे दिली. यावेळी सूत्रसंचालन डॉ. टी. सी. पाटील तर आभार डॉ. डी.बी. उफाडे यांनी मानले.

## पांझरा प्रकल्पातून डाव्या कालव्यात पाणी सोडण्यात यावे यासाठी शेतकऱ्यांतर्फे निवेदन



**पिंपळनेर ।** येथील पांझरा प्रकल्पातून डाव्या कालव्यातून पाणी मिळण्याबाबत व आवर्तन सोडण्याबाबत शेतकरी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने शाखा अधिकारी पाटबंधारे विभाग पिंपळनेर यांना बुधवार दि.१३ ऑगस्ट रोजी निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, खरीप हंगाम चालू असून देखील पाणी नाही, शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची गरज आहे,पाण्याअभावी तोंडाशी आलेला घास वाया जाण्याची शक्यता आहे,त्यातच ऐन हंगामात वरून राजाने पाठ फिरवल्यामुळे पिंपळनेर आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान देण्यासाठी डाव्या कालव्यात तात्काळ पाणी सोडण्यात यावे. उजव्या कालव्यामध्ये २० दिवसापासून सरसकट पाणी सुरू आहे मात्र डाव्या कालव्याच्या माध्यमातून स्थानिक शेतकऱ्यांसाठी पाण्याचे नियोजन नाही. त्यामुळे सामोडे, पिंपळनेर, जेबापूर, परिसरामधील सर्व शेतकऱ्यांसाठी डाव्या कालव्यातील पाणी सोडण्यात यावे तसेच पाटचारी क्रमांक १४ नादुरुस्त झाली असून तिची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी शेतकरी व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पाटबंधारे शाखा अभियंता पिंपळनेर यांना निवेदनाद्वारे केली आहे. निवेदन देतांना शिवसेनेचे पिंपळनेर तालुकाप्रमुख तुषार गवळी, पिंपळनेर तालुका समन्वयक ज्ञानेश्वर पगारे, मनोज खैरनार, महेश वाघ, अशोक सोनवणे, खुशाल वाडेकर, शेतकरी अरुण घरटे आदी शेतकरी बांधव उपस्थित होते.

## स्वच्छतेचा संदेश देत काजल पंजाबी यांच्या हस्ते भगूरला ध्वजवंदन

**नाशिक ।** सालाबाद प्रमाणे या वर्षीही साई किरण स्टील सेंटर लहवित रोड भगूर येथे संचालक व कारागिर कामगार बांधवांच्या वतीने सामाजिक उपक्रम राबवत भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. काजल अशोक पंजाबी उपस्थित होत्या. त्यांच्याच हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास दयावान बाबा, अशोक हुकूमचंद पंजाबी, आसिफ शेख, कैलास पाटील, रामा पाटील, मधुकर जावळे, राजू डोंगरे, शरद वाघ, नितीन खंदारे, अंकुश कुंभरगावे बहादूर आदि मान्यवर उपस्थित होते. स्वातंत्र्य दिन विशेष उपक्रम म्हणून आपलं गाव, शहर, नदी स्वच्छ ठेवा असा संदेश देत रस्त्यावर थुंकणार नाही, ध्वनी वायू प्रदुषण करणार नाही, कायदा सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी पोलीसांना हातभार लावत आपणही शहरासाठी योगदान देऊ असा निर्धार सौ. काजोल पंजाबी यांनी केला. पाणी विज वाया जाऊ देणार नाही आपला परीसर स्वच्छ ठेवणार अशी सामुदायिक शपथ यावेळी देण्यात आली. गोमाता सेवक वृक्षमित्र अशोक पंजाबी उर्फ दयावान बाबा



गेल्या ४० वर्षांपासून पंजाबी परीवाराच्या वतीने कामगारांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा केला जातो. स्वातंत्र्य दिन पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. सोमवारी शिवभक्तांसाठी एक हजार भाविकांसाठी महा भंडारा प्रसाद आयोजित करण्यात आला असून गोमाता सेवा करण्याचा निर्धार करत गो शाळेतील दहा गाई दत्तक घेण्यात आल्या. १५ ऑगस्टचे औचित्य साधून पुणे महामार्ग, नासर्डी पुल, ब्लाईंड विद्यार्थी वसतीगृहात आठवड्यातून दोनदा भोजन देण्याच्या उपक्रमाचा यावेळी शुभारंभ करण्यात आला.

## गांधी विचाराची अन् खादीची आजही प्रासंगिकता : ॲड. ठाकरे

**नाशिक ।** इतिहास संशोधक प्रा. डॉ. नारायण शिंदे यांच्या 'खानदेशातील खादी चळवळ' ग्रंथाचे प्रकाशन मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व नामवंत इतिहास संशोधक डॉ. लहु गायकवाड यांच्या हस्ते १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी सावानाच्या औरंगाबादकर सभागृह, नाशिक येथे संपन्न झाले.

यानिमित्त ॲड. ठाकरे म्हणाले की, गांधीजींचा जनतेवर मोठा प्रभाव होता. त्यांच्या हाकेला जनतेकडून प्रतिसाद मिळे. त्यामुळे त्यांनी सुरू केलेली खादी चळवळ स्वातंत्र्याचे एक मोठे साधन ठरली. प्रत्येक खेडे स्वावलंबी व्हावे म्हणून ही चळवळ त्यांनी सुरू केली. चरखा घराघरात पोहोचला. गृह, कुटीर उद्योगांना प्रेरणा मिळाली. ऐतदेशीय उद्योगांना दिलेल्या प्रोत्साहनामुळे परदेशी मालाची मागणी कमी झाली. भारत स्वातंत्र्यकडे वेगाने वाटचाल करू लागला. गांधीजींचे विचार आणि खादी यांची आजही प्रासंगिकता आहे. गांधी विचार संपलेला नाही. गांधीजींचे अस्तित्व भारतीयांच्या मनामनात आहे. गांधी विचार नवीन पिढीला शिकविणे गरजचे असल्याचे ते म्हणाले. प्रमुख वक्ते इतिहास संशोधक डॉ. गायकवाड (नारायणगाव) म्हणाले की, खादी विषयावर स्वातंत्र्यानंतर नारायण शिंदे यांनी नवीन माहिती समोर आणणारा ग्रंथ निर्माण केला आहे. खादी हे केवळ स्वदेशी वस्त्रच नव्हे तर ब्रिटिश सत्तेला भारतातून घालून



टाकण्यासाठीचा महत्तम मार्ग होता. खादी हे स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचे साधन होते. ग्रामउद्योग, कुटीर उद्योग, हस्त उद्योग आणि स्वदेशीचा नारा खादीच्या माध्यमातून पुढे येतो. खादीला ३००० वर्षाची परंपरा असून खादीचे महत्व न्या. रानडे, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांनी ओळखले होते. स्वातंत्र्य चळवळीत खादीच्या प्रबोधनासाठी नाट्य, साहित्य, विविध कला यातून प्रयत्न झालेले आहेत. या सर्वांचा उलगडा इतिहास संशोधक नारायण शिंदे यांनी आपल्या ग्रंथातून केला आहे. खादी संदर्भातील हा महत्त्वपूर्ण असा संदर्भ ग्रंथ सिद्ध झाला आहे, असे मत व्यक्त केले. प्रा. डॉ. व्ही.पी. बिरारी म्हणाले की, खादी ही देशप्रेम तळागाळात पोहचवणीरी चळवळ होती. आजही स्वदेशी काळाची गरज आहे. प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांप्रसंगी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, प्राध्यापकांनी जास्तीत जास्त संशोधनात्मक कार्यात गुंतून घ्यावे. नवनवीन संशोधन समाजापुढे मांडावे. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात लेखक प्रा. डॉ. नारायण शिंदे यांनी ग्रंथलेखनाचा हेतू विशद केला. ग्रंथलेखनाच्या प्रवासात ज्यांनी ज्यांनी मौलिक मार्गदर्शन व मदत केली त्यांच्याप्रती कृतज्ञता भाव व्यक्त केला. कवी आणि ग्रंथाचे मुखपृष्ठावर विष्णू थोरे, ग्रंथाचे प्रकाशक लोकसंस्कृती प्रकाशन नारायणगावचे शिवाजी शिंदे यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मिलींद थोरात यांनी केले, तर आभार डॉ. संतोष बोडके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. किरण शिंदे, गिरीधर महाले, विशाल महाले, सागर शिंदे, मयुरी जोरे यांनी मेहनत घेतली. याप्रसंगी मोठ्या संख्येने इतिहासप्रेमी प्राध्यापक उपस्थित होते.

# मोहाडी यात्रोत्सवाची ज्ञान, भक्ती, शक्तीच्या उपासनेतून भव्य सांगता

सुनील घुमरे

**मोहाडी ।** श्रीकृष्ण जन्माष्टमी, ग्रामदैवत मोहाडमल्ल व कान्होबा यात्रेनिमित्त गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या मोहाडी यात्रोत्सवाची सांगता भव्य कुस्ती स्पर्धेने झाली. ज्ञानप्रबोधन, भक्ती आणि शक्ती यांचा संगम घडवणाऱ्या या यात्रेत विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांनी गावात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.





उत्सवाची सुरुवात प्रबोधनपर व्याख्यानमालेने झाली. त्यानंतर भक्तीमय किर्तनमाला, भागवत कथन, श्रीकृष्ण जन्म, भजन संध्या, गोपाळकाला, दहीहंडी या कार्यक्रमांनी यात्रेचा रंग अधिक खुलला. परंपरेप्रमाणे कुस्ती स्पर्धांना विशेष आकर्षण लाभले. यंदाही गोपाळकाल्याच्या दिवशी छोटेकड्यात, तर दुसऱ्या दिवशी मोठ्या कड्यात स्पर्धा पार पडल्या. ग्रामस्थांच्या देणगीसोबतच अनेक मानाच्या कुस्त्या स्मरणार्थ परिवाराकडून प्रायोजित झाल्या. कै. सुनील गंगाधर जाधव गुरुजी यांच्या स्मरणार्थ ढाल व रु.५५५५ च्या मानाच्या अंतिम कुस्तीत मालेगावचा विजय गवळी व करंजवणचा विकास मोरे यांच्यात लढत झाली. त्यात विकास मोरे विजयी झाला. माजी अध्यक्ष कै. गणपत माधवराव जाधव यांच्या स्मरणार्थ गदा व रु.२५०० ची कुस्ती चांदवडच्या पृथ्वीराज यज्ञेकर व भगूरच्या वैभव तुपे यांच्यात रंगली, ज्यात वैभव तुपे विजयी झाला. दिवंगत पंच कै. शिवाजी श्रीराम जाधव यांच्या स्मरणार्थ रु.५००० ची कुस्ती चांदवडच्या आशुतोष चंदन व लखमापूर (सटाणा) चा किरण पवार यांच्यात झाली; तर कै. गंगाधर खंडेराव जाधव यांच्या स्मरणार्थ गदा व रु.२५५५ साठी चांदवडच्या संदीप बिन्नर व पिंपळगावच्या सार्थक नागरे यांच्यात लढत झाली. मात्र पावसाच्या व्यत्ययामुळे दोन्ही लढती अनिर्णित राहून बक्षीस विभागून देण्यात आले. कै. पांडुरंग देवराम कदम गुरुजी यांच्या स्मरणार्थ गदा व रु.२१०० च्या स्पर्धेत कोराट्याचा नवनाथ मालसाने याने धुळ्याच्या अजय गवळीवर मात करून विजेतेपद पटकावले. स्थानिक पहिलवानांमध्ये सुनील जाधव, शरद मोगरे, समाधान जाधव व कार्तिक मोगरे यांनीही दमदार कामगिरी केली. मुलींच्या गटात मोरंबी (इगतपुरी) येथील श्रावणी शिंदे व मोहाडीच्या कस्तुरी जाधव यांच्यात झालेल्या सामन्यात श्रावणी शिंदे हिने विजय मिळवला. कुस्ती स्पर्धांचे उद्घाटन व पारितोषिक वितरण मविप्र संचालक प्रवीण जाधव, मविप्र शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. विलास देशमुख, पंच कमिटी अध्यक्ष लक्ष्मण पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. परीक्षक म्हणून विठ्ठल जाधव, माणिक जाधव, पंढरीनाथ कळमकर, सर्जेराव देशमुख यांच्यासह अन्य पंचांनी कामगिरी केली. समालोचन प्रा. कैलास कळमकर व सुदर्शन जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन धनंजय वानले यांनी मानले. प्रथमेश जाधव यांनी चित्रीकरण केले.यात्रोत्सवाच्या संपूर्ण कालावधीत दिंडोरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक शेगर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय सोपान राखोंडे, हवालदार प्रमोद मुंडे व ललित जाधव यांनी प्रभावी बंदोबस्त ठेवला होता.



# ...आणि इंटरनेटचं व्यसन सुटलं

सध्याच्या इंटरनेटच्या जगात लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच स्मार्टफोनचं व्यसन लागलं आहे. बरीच मुलं स्मार्टफोन हातात घेऊन तासनतास गेम खेळत बसतात. सोशल मीडियावर पडिक असतात. ही मुलं मैदानी खेळ खेळत नाहीत, वाचत नाहीत, अभ्यासातही मागे पडतात. मग अशा मुलांना या व्यसनातून बाहेर काढण्यासाठी पालक निरनिराळ्या कल्पना लढवतात. कॅनडामधल्या कॅलगरीमध्ये राहणाऱ्या जेमी क्लार्क यांनीही आपल्या मुलाचं स्मार्टफोनचं व्यसन सोडवण्यासाठी अजब युक्ती लढवली. त्यांचा १८ वर्षांचा मुलगा खोबे सतत फोनमध्ये डोकं खुपसून बसायचा. मग जेमी यांनी त्याला मंगोलियातल्या दुर्गम परिसरात नेलं. तिथे इंटरनेटच काय, वाहतुकीचीही सोय नव्हती. मंगोलिया कॅनडापासून आठ हजार किलोमीटर लांब आहे. जेमी यांनी मुलासोबत २२०० किलोमीटर अंतर कापलं. या काळात जेमी खोबेला वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन गेले. त्यांनी बाईकवरून प्रवास केला, घोड्यावरून फिरले. डोंगराळ भागात तंबूमध्ये राहिले. खोबेला हे वातावरण खूप आवडलं. या प्रवासादरम्यान त्याला मोबाईल वापरता आला नाही. यामुळे खोबेचं मोबाईलचं व्यसन कमी झालं. इंटरनेट वापरलं नाही तर त्याची खूप चिडचिड होत असे. पण या प्रवासामुळे त्याची ही सवय सुटली. आता तो आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवतो. भरपूर गप्पा मारतो, वाचन करतो. हे जग इंटरनेटपेक्षाही खूप सुंदर आहे याची जाणीव खोबेला झाली.

# वाहतुकीचे नियम सांगण्यासाठी गाण्यांचा आधार

शहरांमध्ये वाहतूक व्यवस्था सांभाळणारे अनेक वाहतूक पोलिस लोकांना नियम मोडले, तर सौम्यपणे समजावून सांगतात, तर काही जण कडकपणे वागतात; परंतु एका वाहतूक पोलिसाची शैली वेगळी आहे. गर्दीच्या चौकात गाणे गाऊन हा पोलिस लोकांना वाहतुकीचे नियम समजावून सांगत आहे.

हेल्मेट, सीट बेल्ट आणि वाहतूक नियमांबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी तो एक गाणे गातो आहे. त्याचा आवाज, शैली आणि संदेश देण्याची पद्धत इतकी प्रभावी आहे, की लोक तिथेच थांबून त्याचे ऐकतात. या पोलिसाच्या शैलीचे अनेक लोक कौतुक करत आहेत. स्त्यांवर चालण्यासाठी वाहतुकीचे नियम बनवले गेले आहेत. वाहतूक पोलिसांचे कर्मचारी त्यांना त्यांचे पालन करायला लावण्यासाठी तैनात असतात. कधीकधी हे वाहतूक पोलिस कर्मचारी लोकांना बोलून समजावून सांगतात, तर कधीकधी त्यांना चालान देऊन धडा शिकवतात; पण आजकाल एका वाहतूक पोलिसाचे



गाण्यात समजावून सांगणे समाज माध्यमावर चांगलेच व्हायरल झाले आहे. वाहतूक पोलिस गाणे गाऊन लोकांना वाहतूक नियम सांगत आहे. त्यात गाण्याचे सूर 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे', 'मेहंदी लगा के रखना' या प्रसिद्ध गाण्यावरून घेतले आहेत. पोलिस कर्मचारी 'फोटो तुम्हारी लेंगे', चलन कटा देंगे असे गाताना दिसत आहे. त्यावर अनेक लोक प्रतिक्रियाही देत आहेत.

# कॅलिडोस्कोप




# इथल्या महिला आहेत चिरतरूण

वय वाढल्याच्या खुणा चेहऱ्यावर दिसू लागतात. तारुण्य सरल्यानंतर चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. म्हणूनच महिला आणि पुरुष तरुण दिसण्यासाठी खूप प्रयत्न करतात. महिला ब्युटी पार्लरमध्ये जातात. कॉस्मेटिक सर्जरी करून घेतली जाते. पुरुषही वेगवेगळे उपचार करून घेतात. मात्र तैवानमधल्या महिलांचं सौंदर्य टिकून राहतं. या महिला चिरतरुण दिसतात. इथल्या महिलांचं वय वाढलं तरी त्या तरुणच दिसतात. तैवान हे एक बेट आहे. तैवान हा चीनचा एक भाग आहे. एक देश म्हणून तैवानचे जगातल्या १७ देशांशी संबंध आहेत. इथल्या महिला खूप सुंदर असतात आणि बराच काळपर्यंत तरुण दिसतात. मात्र या सौंदर्याचं रहस्य त्यांचा आहार किंवा मेक अप नाही तर वेगळ्याच कारणामुळे त्या चिरतरुण राहतात. तैवानमधल्या महिला आपल्या रुपाला खूप जपतात. त्यामुळे या महिला उन्हात बाहेर पडत नाहीत. उन्हात बाहेर पडल्यामुळे आपण काळे होऊ अशी भीती त्यांना वाटते. इथल्या महिला पावसातही भिजत नाहीत. तैवानमधल्या लोकांना खेळायला आवडतं. त्यामुळे ते तंदुरुस्तही असतात. याच कारणामुळे इथल्या महिला चिरतरुण दिसतात.




# इवलेसे देश

आपला देश आकाराने खूप मोठा आहे. या जगात १९५ देश आहेत. काही देशांचा आकार खूप मोठा आहे तर काही देश आकाराने खूपच लहान आहेत. या देशांची नावंही आपल्याला माहीत नसतील. अशाच काही देशांची ओळख कुतुहलजनक आहे. भूमध्य समुद्रात माल्टा नावाचा देश आहे. हा देश सात बेटांचा समूह आहे. या देशाचं क्षेत्रफळ फक्त ३१६ चौरस किलोमीटर आहे. या देशाची लोकसंख्या फक्त साडेचार लाख इतकी आहे. १९६४ मध्ये माल्टा स्वतंत्र झाला. या देशावर बऱ्याच राष्ट्रांनी राज्य केलं. हिंदी महासागरातला मालदीवही जगातल्या काही छोट्या देशांपैकी एक आहे. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विचार केला तर मालदीव हा आशिया खंडातला सर्वात लहान देश आहे. २९८ चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या या देशाची लोकसंख्या साडेचार लाखांच्या आसपास आहे. मालदीवला १९६६ मध्ये स्वातंत्र्य मिळालं. इथे पर्यटक मोठ्या संख्येने येतात. कॅरेबियन समुद्रात सेंट किट्स आणि नेविस हे दोन देश आहेत. ही दोन सुंदर अशी बेटं आहेत. त्यांचा शोध ख्रिस्तोफर कोलंबसने लावला होता. सेंट किट्स १६८ चौरस किलोमीटर तर नेविस ९३ किलोमीटर परिसरात पसरला आहे. पॅसिफिक महासागरात मार्शल हा बेटांचा समूह आहे. हा सुद्धा एक देश आहे. इथे १०० पेक्षा अधिक बेटं आहेत. या देशाचं संविधान आणि झेंडाही आहे. अमेरिकन डॉलर हे इथलं चलन आहे.




# स्मशानभूमीमध्ये क्यूआर कोड

स्मशानभूमीचे नाव ऐकताच बहुतेक लोकांच्या मनात शांतता आणि भूतकाळातील आठवणी येतात. पण कल्पना करा, की कबरीवरचा एक छोटासा क्यूआर कोड तुमच्या डोळ्यासमोर एखाद्याच्या संपूर्ण आयुष्याची कहाणी उलगडतो का? केरळमधील एका स्मशानभूमीत असेच काहीसे घडले आहे.

एका स्मशानभूमीतील कबरींना क्यूआर कोड जोडलेले आहेत, जे कोणीही स्कॅन करून मृताची संपूर्ण माहिती जाणून घेऊ शकते. क्यूआर कोड स्कॅन होताच मृताची माहिती मिळते. क्यू आर कोड स्कॅन करताच फोनमध्ये एक वेबसाइट उघडते. या वेबसाइटमध्ये त्या कबरीत पुरलेल्या व्यक्तीची संपूर्ण माहिती आहे. फक्त नाव किंवा वयच नाही, तर त्याची संपूर्ण जीवनकथा. त्याने कोणते काम केले, त्याच्या कुटुंबातील सदस्य कोण आहेत, त्याचे जुने फोटो आणि त्याच्या आठवणी आणि जीवनातील खास क्षण हे सर्व एकाच ठिकाणी दिसतात. त्या वेबसाइटवर 'आठवणी', 'कुटुंब', 'जीवनकथा' आणि 'टाइमलाइन' असे अनेक टॅब आहेत. त्यातून लोक त्या व्यक्तीबद्दल अधिक सखोल जाणून घेऊ शकतात.

सर्वात अनोखी गोष्ट म्हणजे अभ्यागत लॉग, म्हणजेच जे कोणी कबरीजवळ येतात, ते तेथे त्यांचे नाव लिहू शकतात, जेणेकरून श्रद्धांजली वाहण्यासाठी कोण आले हे कळू शकते. तिथे एक ओळ आहे जी प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्श करते, 'ही फक्त एक कबर नाही. ही एक जिवंत कहाणी आहे.' आता लोक 'सोशल मीडिया'वर वेगवेगळी मते देत आहेत. काही जण याला एक उत्तम कल्पना म्हणत आहेत. त्यामुळे प्रियजनांच्या आठवणी नेहमीच जिवंत राहतील, तर काही लोक म्हणत आहेत, की स्मशानभूमीच्या शांततेत तंत्रज्ञानाचा हा खूप हस्तक्षेप आहे.

'सोशल मीडिया' वापरकर्ते वेगवेगळ्या प्रतिक्रिया देत आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले... ही एक अतिशय छान प्रणाली आहे, तुम्ही तुमच्या प्रियजनांच्या आठवणी पुन्हा जिवंत करू शकता. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले... या माहितीचा गैरवापरदेखील होऊ शकतो, तर अन्य एका वापरकर्त्याने लिहिले... हे खूप आश्चर्यकारक आहे, एक अतिशय सोपा आणि उत्तम मार्ग आहे.

# अबब... केवढं मोठं हे फुल!

उमललेलं फूल खूप सुंदर दिसतं. शास्त्रज्ञांना जगातलं सर्वात मोठ्या आकाराचं उमललेलं फूल सापडलं आहे. इंडोनेशियातल्या पश्चिम मध्य सुमात्रा बेटांवरच्या जंगलांमध्ये हे फूल सापडलं आहे. हे फूल खूपच अनोखं आणि सुंदर आहे. हे महाकाय फूल बघून शास्त्रज्ञही चाट पडले. हे फूल चार चौरस फूट परिसरात पसरलं आहे. या फुलाला रेफलिसिया



म्हटलं जातं. २०१७ मध्ये याच जंगलात तीन फूट लांबीचं आणि बारा किलो वजनाचं याच जातीचं फूल सापडलं होतं. ते त्यावेळचं सर्वात मोठं उमललेलं फूल होतं. मात्र आता या फुलाचा विक्रम मोडीत निघाला आहे. रेफलिसिया हे परजीवी फूल असून यातून सुगंध नाही तर दुर्गंध येतो. या फुलाची रचना सूर्यफुलासारखी असते. मात्र त्याचा रंग केशरी, आकाशी किंवा पांढरा असतो. हे फूल वर्षातले काही महिने उमलतं. ऑक्टोबरमध्ये हे फूल उमलू लागतं आणि मार्चपर्यंत पूर्णपणे उमलतं. काही काळानंतर हे फूल मरून जातं.



# विमानतळाच्या रन वे वरून धावते ट्रेन!

जगात अनेक विमानतळ आहेत; परंतु न्यूझीलंडचे गिस्बॉर्न विमानतळ पूर्णपणे वेगळे आणि मनोरंजक आहे. येथे उडणाऱ्या विमानाबरोबरच त्याच ठिकाणाहून जाणारी ट्रेन दिसते. एक रेल्वे लाईन ज्या मार्गावरून जाते, त्याच मार्गावरून विमाने उड्डाण करतात आणि उतरतात.

हे विमानतळ इतके खास आहे, की जर एखादी ट्रेन येत असेल तर विमानाला थांबावे लागते आणि जर विमान उड्डाण करणार असेल तर ट्रेन थांबवली जाते. येथे दोघांनाही एकमेकांना रस्ता द्यावा लागतो. गिसबॉर्न विमानतळ सुमारे १६० हेक्टरमध्ये पसरलेले आहे आणि त्यातून एक रेल्वे लाईन जाते, जी विमानतळाला दोन भागात विभागते. या रेल्वेला गिस्बॉर्न सिटी व्हिंटेज रेल्वे म्हणतात. ही ट्रेन वाफेवर चालते आणि वर्षातून सुमारे १५ वेळा धावपट्टीवरून जाते, विशेषतः उन्हाळ्याच्या हंगामात जेव्हा जास्त लोक येथे भेट देण्यासाठी येतात. या विमानतळावर काम करणारे लोक एकाच वेळी ट्रेन आणि विमान दोन्हीचा वेळ व्यवस्थापित करतात. कोण कधी येईल आणि कोणाला आधी रस्ता द्यायचा याची त्यांना पूर्ण काळजी घ्यावी लागते.

हे विमानतळ लहान दिसू शकते; परंतु दरवर्षी तिथून दीड लाखांहून अधिक लोक प्रवास करतात आणि येथून दर आठवड्याला सुमारे ६० देशांतर्गत उड्डाणे होतात. याशिवाय, येथे एक मुख्य धावपट्टी आणि तीन लहान धावपट्या आहेत. त्यामुळे ते अधिक खास बनते. गिसबोर्न विमानतळ हे असे ठिकाण आहे, जिथे अभियांत्रिकी, शहाणपण आणि वेळेचे योग्य नियोजन एकत्रितपणे काहीतरी खूप वेगळे निर्माण करते. येथे जाताना असे वाटते, की एखाद्या चित्रपटातील एक दृश्य समोर आले आहे, जिथे विमाने उडत आहेत आणि त्याच वेळी ट्रेन ट्रॅकवर धावत आहे.

# कर्जफेड न केल्याने कर्जदाराची बायको जप्त!

कर्ज घेताना तारण म्हणून बँकेकडे काही वस्तू तारण ठेवावी लागते. कर्जाची परतफेड करू शकले नाहीत, तर बँक तारण म्हणून ठेवलेली गोष्टच जप्त करते, मग ते घर असू शकते किंवा सोने अथवा कार, दुचाकी वगैरे वगैरे; पण बँकवाल्यांनी एखाद्या जिवंत व्यक्तीवर, तेही एखाद्या महिलेवरच जप्ती आणून तिला सोबत नेल्याचा विचित्र प्रकार झाशीमध्ये घडला असून, बँक अधिकाऱ्यांच्या या गुंडगिरीविरोधात संताप व्यक्त करण्यात आला.

उत्तर प्रदेशातील झाशीमध्ये खासगी बँकेने कर्जाची रक्कम वसूल करण्यासाठी सर्व मर्यादा ओलांडल्या. कर्जाचा हप्ता न भरल्यामुळे, एका खासगी मायक्रो फायनान्स बँकेने एका महिलेला पाच तास ओलीस ठेवले. हप्ता दे आणि बायकोला ने, असे तिच्या पतीला सांगण्यात आले. हे प्रकरण बमहरौली गावातील आझाद नगर परिसरातील एका खासगी गट कर्ज देणाऱ्या बँकेशी संबंधित आहे. पूंछ येथील बाबाई रोड येथील रहिवासी रवींद्र वर्मा यांच्या पत्नी पूजा वर्मा यांना जबरदस्तीने बँकेत बसवण्यात आलं,असा आरोप आहे. पैसे द्या, तरच तुम्हाला तुमची पत्नी मिळेल असे उत्तर त्या महिलेच्या पतीला देण्यात आले. ते ऐकून तो हबकला.

रवींद्रने तिथे खूप विनवणी केली; पण बँक कर्मचाऱ्यांनी जराही दया दाखवली नाही. शेवटी, हताश होऊन रवींद्रने १११ नंबरवर फोन केला. पोलिस येताच बँक कर्मचाऱ्यांचे



चेहरे पडले आणि महिलेला घाईघाईने बाहेर काढण्यात आले. आरोपपीडित पूजा वर्मा हिने दिलेल्या अर्जात असे सांगितले, की तिने ४० हजार रुपयांचे कर्ज घेतले आहे. तिने आतापर्यंत ११ हप्ते भरले आहेत; परंतु बँकेच्या नोंदींमध्ये फक्त ८ हप्तेच दिसत आहेत. बँक एजंट कौशल आणि धर्मेंद्र यांनी तिचे तीन हप्ते हडप केल्याचा आरोप आहे.

मध्य प्रदेशातील टिकमगढ येथील रहिवासी असलेले बँक 'सीओ' संजय यादव तिच्या घरी पोहोचले आणि धमकी देऊन पैशाची मागणी करू लागले,असा आरोप महिलेने केला; मात्र त्या महिलेने नकार दिल्यावर पती-पत्नीला जबरदस्तीने बँकेत आणण्यात आले आणि तिथेच अनेक तास बसवून ठेवण्यात आले, असेही महिलेचे म्हणणे आहे. कानपूर देहात येथील रहिवासी बँक व्यवस्थापक अनुज कुमार यांनी सांगितले, की ती महिला गेल्या ७ महिन्यांपासून हप्ता भरत नव्हती, म्हणून तिला बोलावण्यात आले. एवढेच नव्हे तर ती महिला स्वतःच्या मर्जीने बँकेत बसली होती, असा दावाही त्यांनी केला.

सध्या पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. बँक कर्मचारी, एजंट आणि पीडित व्यक्तीची चौकशी सुरू आहे. कर्ज वसुलीच्या नावाखाली लोकांना ओलीस ठेवण्यासारखे डावपेच आता सामान्य झाले आहेत का? या घटनेने केवळ बँकेच्या कामकाजावरच नव्हे तर कायदा आणि सुव्यवस्थेवरही मोठा प्रश्न उपस्थित केला आहे.

# सडपातळ दिसण्याच्या नादात केले नको ते!

प्रत्येकालाच आपल्या वाढदिवसाला सर्वात सुंदर दिसायचे असते. नवीन कपडे घालून इतरांपेक्षा वेगळे दिसावे, असा प्रयत्न असतो; पण जेव्हा ही इच्छा जास्त होते, तेव्हा ती धोकादायक बनू शकते.

चीनमधील एका १६ वर्षीय मुलीने तिच्या वाढदिवसाला सडपातळ दिसण्यासाठी अशी चूक केली की तिचा जीव धोक्यात आला. वजन कमी करण्यासाठी तिने दोन आठवडे फक्त उकडलेल्या भाज्या खाल्लया आणि रेचक औषधे घेऊ लागली. परिणामी तिला रुग्णालयात दाखल करावे लागले आणि तिचा जीव वाचवणे कठीण झाले. चीनमधील मेई नावाची १६ वर्षीय मुलगी खूप आनंदी होती. कारण तिचा वाढदिवस जवळ आला होता. त्या दिवशी तिने नवीन ड्रेस घातल्यावर सर्वांनी तिचे कौतुक करावे, अशी तिची इच्छा होती. तिथपर्यंत ठीक होते; पण मेईला वाटले, की ती थोडी जाड आहे. त्याबाबत विचार करून ती कमी खाऊ लागली. तिने दररोज फक्त थोड्या उकडलेल्या भाज्या खाल्लया आणि पोट साफ करणारी औषधेदेखील घेतली.

असे करत करत दोन आठवडे गेले. मग अचानक एके दिवशी मेईचे हातपाय थरथर कापू लागले. तिला खूप अशक्त वाटू लागले आणि श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. तिचे कुटुंब घाबरले आणि तिला तातडीने रुग्णालयात घेऊन गेले. डॉक्टरांनी रुग्णालयात तिचे रक्त तपासले, तेव्हा असे आढळून आले, की तिच्या शरीरात पोटॅशियम खूप कमी झाले आहे. पोटॅशियम हे एक खनिज आहे, जे आपले हृदय आणि स्नायू योग्यरित्या कार्य करण्यास मदत करते. जेव्हा ते खूप कमी होते तेव्हा हृदयाचे ठोके थांबू



शकतात किंवा एखाद्या व्यक्तीचा श्वास थांबू शकतो.

डॉक्टरांनी ताबडतोब मेईला आपत्कालीन वॉर्डमध्ये दाखल केले आणि तिच्यावर १२ तास सतत उपचार केले. डॉक्टरांनी सांगितले, की मेईची प्रकृती इतकी बिकट झाली आहे, की तिला कधीही हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. जर थोडा जास्त उशीर झाला असता तर तिचा जीवही जाऊ शकला असता.



# जीएसटी सुधारणा घोषणेला बाजाराची जोरदार सलामी

## सेन्सेक्स 676 अंकांनी वाढून बंद


**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यातील बैठकीनंतर तेल पुरवठ्याबाबत कमी झालेली चिंता आणि पंतप्रधान मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी केलेल्या जीएसटी प्रणालीत सुधारणा घोषणेचे शेअर बाजाराने सोमवारी जोरदार स्वागत झाले. सुरुवातीला सेन्सेक्स १,१०० अंकांची वाढ नोंदवली. त्यानंतर सेन्सेक्स ६७६ अंकांच्या वाढीसह ८१,२७३ वर स्थिरावला. तर निफ्टी ५० निर्देशांक २४५ अंकांनी वाढून २४,८७६ वर बंद झाला.

बेंचमार्क निर्देशांकासोबतच बीएसई मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकातही तेजी दिसून आली. बीएसई मिडकॅप १ टक्क्यांनी आणि स्मॉलकॅप निर्देशांक १.३९ टक्क्यांनी वाढला.

या दरम्यान, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप मागील सत्रातील ४४५ लाख कोटी रुपयांवरून वाढून ४५१ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाले. त्यामुळे गुंतवणूकदारांना एका दिवसातच ६ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० मधील टॉप गेनर्समध्ये सर्वाधिक फायदा मारुती सुझुकीला झाला, ज्यात ८.७६ टक्क्यांची तेजी दिसली. त्यानंतर हिरो मोटोकॉर्पमध्ये



**सेन्सेक्स 81,273**

**निफ्टी 24,876**

५.८७ टक्क्यांची तेजी, बजाज फायनान्समध्ये ५.०८ टक्क्यांची तेजी, नेस्ले इंडियामध्ये ५.०३ टक्क्यांची तेजी आणि बजाज ऑटोमध्ये ४.५७ टक्क्यांची तेजी दिसून आली.

तर निफ्टी ५० मध्ये सर्वाधिक नुकसान आयटीसीला झाले, ज्यात १.२६ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर एलअँडटीमध्ये १.१४ टक्क्यांची घसरण, इटरनलमध्ये १.१ टक्क्यांची घसरण, टेक महिंद्रात १.०५ टक्क्यांची घसरण, एनटीपीसीमध्ये ०.९८ टक्क्यांची घसरण दिसली.

सेक्टोरल निर्देशांकांमध्ये सर्वाधिक फायदा निफ्टी ऑटोला झाला, ज्यात ४.१८ टक्क्यांची तेजी दिसली. निफ्टी रिअल्टीमध्ये २.१७ टक्क्यांची तेजी, निफ्टी इंडिया कन्झ्युमरमध्ये २.११ टक्क्यांची तेजी, निफ्टी मेटलमध्ये १.८६ टक्क्यांची तेजी, निफ्टी एफएमसीजीमध्ये १.१९ टक्क्यांची तेजी आणि निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये १.०५ टक्क्यांची तेजी दिसून आली.

# लातूरमध्ये पुरात 70 शेळ्या, 7 बैल वाहून गेले

**लातूर, दि. १८ प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्याला पावसाने अक्षरशः झोडपलंय. उदगीर तालुक्यातील बोरगाव गावात रात्री पुराचे पाणी शिरल्याने भीषण परिस्थिती निर्माण झाली होती. अनेक ग्रामस्थांचे संसार उध्वस्त झाले आहेत. पुराच्या पाण्यात ७० शेळ्या, ७ बैल, ५ म्हशी, दोन ट्रॅक्टर आणि एक पिकप वाहन वाहून गेले आहे. हजारो एकर शेती खरवडून गेली असून उभं पीक पाण्यात गेलंय. गावातील अंगणवाडी केंद्र घरे किराणा दुकाने गोठे पाण्याखाली गेले आहेत. जनजीवन विस्कळीत झाले आहे.

रात्री झालेल्या पावसाने लेंडी नदीला पूर आला असून धडकनाळ व बोरगाव या गावांमध्ये पाणी शिरलंय. बोरगावने अक्षरशः तळ्याचे रूप धारण केलं असून गाव चारही बाजूंनी पाण्याने



वेढले गेला आहे. रात्री दोन वाजल्यापासून गावकऱ्यांनी आहे त्या अवस्थेत रात्र काढली. उदगीर मुख्रमाबाद देगलूर रस्ता पूर्णपणे बंद झालाय. धडकनाळ येथील पूल पाण्याखाली गेल्याने वाहतूक ठप्प झाली आहे.

लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील बोरगाव गावाला शनिवारी रात्री मुसळधार पावसाने अक्षरशः उध्वस्त केलं. गावात पाणी शिरल्याने भीषण पूरस्थिती निर्माण झाली असून ग्रामस्थांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. पुराच्या पाण्यात ७० शेळ्या, सात बैल, पाच म्हशी, दोन ट्रॅक्टर आणि एक पिकअप वाहन वाहून गेले. हजारो एकर शेती खरवडून गेली असून उभं पिकं पूर्णपणे नष्ट झालं आहे. शेतकऱ्यांचे ठिबक सिंचन, पाईपलाईन, गुरं-ढोरं आणि इतर शेतीसंबंधी साहित्य वाहून गेल्याने लाखोंचं नुकसान झालं आहे.

गावातील अंगणवाडी केंद्र, घरे, किराणा दुकाने, गोठे पाण्याखाली गेले. कपडे, धान्य, किराणा आणि घरगुती साहित्य पूर्णपणे खराब झालं आहे. गावातील साडेतीन हजार लोकसंख्येत शेकडो नागरिकांना आपली घरं सोडून मंदिरात आश्रय घ्यावा लागला. "अशा प्रकारचा पाऊस व एवढं मोठं नुकसान आम्ही कधीच पाहिलं नव्हतं," असा गावकऱ्यांचा सूर आहे. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे व भाजपा नेते पंडित सूर्यवंशी यांनी नुकसानीचा आढावा घेतला असून, "पूरामुळे झालेलं नुकसान कोट्यवधींच्या घरात गेलं आहे. गाव उद्ध्वस्त झालं असून शासनाने तातडीने मदतकार्य सुरू करावं," अशी मागणी त्यांनी केली आहे.

# इंदूरमध्ये दोन हृदय असलेल्या मुलीचा जन्म

**इंदूर, दि. १८ वृत्तसंस्था**

मध्य प्रदेशातील इंदूरमध्ये जन्मलेली एक मुलगी चर्चेत आली आहे. १३ ऑगस्ट रोजी मोथापुरा गावातील महिलेने एका विशेष मुलीला जन्म दिला. या मुलीला दोन डोके, चार हात आणि दोन हृदये आहेत, तर तिची छाती आणि पोट जोडलेले आहे. तर, मुलीला दोन सामान्य पायदेखील आहेत. सध्या मुलीची प्रकृती स्थिर आहे आणि डॉक्टर तिच्यावर सतत लक्ष ठेवून आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुलीची प्रसूती एमटीएच रुग्णालयात झाली. मात्र, गंभीर स्थिती पाहून तिला एमवाय हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले. मुलीला एमवाय हॉस्पिटलच्या आपत्कालीन वॉर्डमध्ये ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आले आहे. डॉक्टरांचे विशेष पथक तिच्या प्रकृतीवर सतत लक्ष ठेवून आहेत. डॉक्टरांनी सांगितले की, सध्या मुलीची प्रकृती स्थिर आहे आणि तिची दोन्ही हृदये सामान्यपणे काम करत आहेत. मात्र, पुढील स्थिती तपासण्यासाठी सोनोग्राफी आणि इतर आवश्यक वैद्यकीय चाचण्या केल्या जात आहेत.

वैद्यकीय भाषेत अशा जोडलेल्या जुळ्या मुलांना 'कंजॉइंड ट्विन्स' म्हणतात. अशी परिस्थिती खूप गुंतागुंतीची मानली जाते. त्यामुळेच अशा मुलांची शस्त्रक्रिया करणे खूप कठीण आणि धोकादायक असते. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, जर सहा महिन्यांनंतर मुलीची प्रकृती अनुकूल राहिली, तर शस्त्रक्रियेच्या मदतीने तिचे शरीर वेगळे केले जाऊ शकते. तथापि, ही प्रक्रिया खूप संवेदनशील आणि गुंतागुंतीची असेल.

# ड्रममध्ये आढळला पुरुषाचा मृतदेह

## पत्नी-मुले आणि घरमालकाचा मुलगा बेपत्ता

**जयपूर, दि. १८ वृत्तसंस्था**

राजस्थानाच्या खैरथल तिजारा जिल्ह्यातील भाड्याच्या घरा एका निळ्या ड्रममध्ये एका तिशीतील पुरूषाचा मृतदेह सापडल्याने खळबळ उडाली आहे. येथे एका व्यक्तीचा मृतदेह त्याच्या भाड्याच्या घराच्या पहिल्या मजल्यावर एका निळ्या ड्रममध्ये कुजत असल्याचे आढळून आले आहे, रविवरी पोलिसांनी याबद्दल माहिती दिली. या घटनेमुळे पुन्हा एकदा उत्तर प्रदेशच्या मेरठ येथील घटनेच्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. मेरठमध्ये अशाच प्रकारे एका निळ्या ड्रममध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता, ज्याची संपूर्ण देशभर चर्चा झाली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशचा रहिवासी असलेला हा माणूस एका वीटभट्टीवर काम करत होता आणि त्याचे नाव हंसराज असे आहे. तसेच घटनेपासून त्याची पत्नी आणि तीन मुले बेपत्ता आहेत, असेही पोलिसांनी सांगितले. एका निळ्या ड्रममध्ये मृतदेह भरून तो बंद करण्यासाठी त्याच्यावर दगड ठेवण्यात आला होता, जेणेकरून दुर्गंधी बाहेर येऊ नये.

जिल्ह्यातील किशनगड बास सर्कलमध्ये तैनात डेप्युटी एसपी राजेंद्र सिंह यांनी सांगितले की "आम्हाला दुपारी कळवण्यात आले की आदर्श कॉलनीमधील एका घरातून दुर्गंधी येत आहे. वरच्या मजल्यावर राहणारे भाडेकरू बेपत्ता होते, पण तिथे एक ड्रम होता.... हा ड्रम उघडला असता आम्हाला आतमध्ये एक मृतदेह सापडला. तो उत्तर प्रदेशातील भाडेकरू हंसराज उर्फ सूरजचा होचा, तो येथील एका वीटभट्टीवर काम करत होता. मृतदेह कपड्यांच्या ढिगाऱ्याखाली होचता आणि त्यावर मीठ लावलेले होते. मृतदेह रुग्णालयात पाठवण्यात आला आहे आणि त्याच्या नातेवाईकांना कळवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. त्याची पत्नी आणि त्यांची तीन मुले तसेच घरमालगाचा मुलगा जितेंद्र देखील बेपत्ता आहे."

"पीडित व्यक्ती हा उत्तर प्रदेशचा रहिवासी आहे आणि किशनगड बास भागात एका वीटभट्टीवर काम करत होता. १५ दिवसांपूर्वी त्याने घर भाड्याने घेतले होते. तेथे तो त्याची पत्नी आणि तीन मुलांबरोबर राहात होता. पोलीस घटनास्थळावरून पुरावे गोळा करण्याचा प्रयत्न करत आहेत," असे अधिकाऱ्यांनी सांगतले. तसेच या व्यक्तीचा मृतदेह ड्रममध्ये किती काळ होता किंवा त्याच्या हत्येमागील नेमके कारण काय आहे हे अद्याप कळू शकलेले नाही, असे पोलिसांनी सांगितले.

# कमी ऊस गाळप क्षमतेचे सहकारी साखर कारखाने टिकणे अवघड- शरद पवार

**पुणे, दि. १८ प्रतिनिधी**

राज्यातील खासगी साखर कारखाने हे राज्याबाहेरील लोकांचे असून त्यांना स्थानिकांशी आस्था नाही. त्यातच या कारखान्यांची दैनिक ऊस गाळप क्षमतेत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे स्पर्धेत कमी ऊस गाळप क्षमता असलेले सहकारी साखर कारखाने टिकणे अवघड असल्याची खंत ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी येथे व्यक्त केली. तर खाजगी साखर कारखान्यांचे प्रस्थ वाढल्याने दिवसेंदिवस सहकारी चळवळीला सुरुंग लागत असल्याचे पाहून अस्वस्थता वाढत असल्याचेही ते म्हणाले.

साथी किशोर पवार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एस.एम. जोशी सभागृहात झालेल्या साखर



उद्योग व कामगार चळवळ-अनुभव व दृष्टी या साखर धोरणासंदर्भातील कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, किशोर पवार प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. किरण ठाकूर, राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, प्रतिष्ठानच्या सचिव वंदना पवार, अंकुश काकडे आदी उपस्थित होते.


उत्तर प्रदेशपाठोपाठ महाराष्ट्रातही आता खासगी साखर कारखान्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून तेथे कमी कामगारांमध्ये कामाची प्रथा सुरु आहे. या कारखान्यांच्या दैनिक ऊस गाळप क्षमता वाढीवर राज्य सरकारने विचार करण्याची गरज आहे. त्यासाठी गाळप क्षमतेबाबत राज्य सहकारी साखर कारखाना संघ व शासन अशी चर्चा घडवून या बाबत धोरण ठरविण्याची गरज आहे. आज सहकार चळवळ संपते असल्याचा उल्लेख करुन ते म्हणाले राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे चित्र वाईट आहे. संगमनेर साखर कारखाना चांगला चालतो, परंतु आजूबाजूला कारखाने बघितले की चिंता वाटते. दौंडमधील भीमा पाटस कारखान्याकडे पाहिले की वाईट वाटते. त्या कारखान्याचा मालक बंगळुरूला राहतो.

# गालगुंड -कारण, लक्षण आणि उपचार

अनेकदा लहान मुलांमध्ये आणि क्वचित मोठ्या माणसांचे देखील अचानक गाल सुजलेले दिसतात. अगदी फुग्यासारखे टम्म. यालाच आपण गालगुंड असे म्हणतो. गालगुंड हा तितकासा गंभीर आजार नसला तरी हा आजार संसर्गजन्य असल्यामुळे गालगुंड झालेल्या एका व्यक्तीकडून दुसऱ्याला विषाणूंचा संसर्ग होऊ नये म्हणून काळजी मात्र घ्यावी लागते. मुळातच गालगुंड हा आजार म्हणजे नक्की कोणता आजार?गालगुंड या आजारात काही ठराविक प्रकारच्या विषाणूंची बाधा होते ती कशामुळे? गालगुंड आजाराची लक्षण नेमकी काय असतात?आणि सर्वात महत्वाचं म्हणजे या आजारावर उपचार काय आहेत?याच प्रश्नाची उकल करण्यासाठी त्वचाविकारतज्ज्ञ डॉ.शामला ढमाले यांच्याशी केलेली बातचीत.

१]गालगुंड म्हणजे नेमका कोणता आजार आहे?

गालगुंड हा विशिष्ट प्रकारच्या विषाणूच्या संसर्गामुळे होणारा आजार आहे. पारोमिक्सोव्हायरस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विषाणूच्या गटाशी संबंधित हा आजार आहे. आपल्या तोंडातील काही लाळ



**हॅलो डॉक्टर**

ग्रंथीमध्ये सूज आल्याने गाल फुगतात आणि जबडा देखील फुगतो. खरं तर गालगुंड हा तसा लहानमुलांमध्ये

**लोकारोग्य**

आढळणारा एक साधारण आजार आहे. १९६७ मध्ये गालगुंडाची लस उपलब्ध झाल्यानंतर या आजाराचे प्रमाण आता अगदीच कमी झालेले आहे.

२]गालगुंड आजाराची कारण नेमकी काय सांगता येतील?

गालगुंडाचा विषाणू जो पॅरामिक्सोव्हायरसचा एक प्रकार आहे तोच गालगुंड होण्यास कारणीभूत ठरतो. हा विषाणू संक्रमित लाळेच्या थेट संपर्काद्वारे किंवा संक्रमित व्यक्तीच्या नाक,तोंड घशातून बाहेर पडणाऱ्या श्वसणाच्या माध्यमातून एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमीत होतो. ज्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असते,प्रवासात एकमेकांच्या संपर्कात येणारे लोक,ज्यांचे विषाणू विरुद्ध लसीकरण झालेले नाही,एकमेकांशी खेळल्यामुळे,लहान मुलांचे चुंबन घेण्याने गालगुंड आजार संक्रमित होतो.

३] गालगुंड या आजाराची लक्षण काय असतात?

गालगुंड झाल्यानंतरची प्राथमिक लक्षण हि अतिशय सौम्य असतात. सुरवातीला हलकासा ताप येतो. डोकेदुखी जाणवते,शरीराचे स्नायू दुखतात,थकवा आल्यासारखे वाटते, भूक लागत नाही अशी साधारण लक्षण असतात. मात्र काही दिवसानंतर तुमच्या पॅरॉटिड ग्रंथींना वेदनादायक सूज येऊ लागते. आपल्या जबड्याच्या आतमधल्या भागात असलेल्या लाळग्रंथी संसर्गित झाल्यामुळे गाल सुजतात आणि फुग्यासारखे दिसतात. जर योग्य आणि वेळीच काळजी घेतली नाही तर गालगुंडाचा आपल्या मेंदू,स्वादुपिंड,अंडकोशावर परिणाम होऊ शकतो.

४] गालगुंड आजारावर उपचार उपलब्ध आहेत का?


गालगुंड हा संसर्गजन्य आजार असून त्यावर कोणताही विशिष्ट उपचार नाही. हा आजार काही दिवसातच स्वतःहून निघून जातो. मात्र तरीही गालगुंडाच्या वेदना कमी करण्यासाठी कोमट मीठ पाण्याने गुळण्या कराव्यात,मऊ आणि सहज चावता येतील असे पदार्थ खावेत,तोंडाला पाणी सुटणारे आमलयुक्त पदार्थ खाणे टाळावे,घसा खवखवणे कमी करण्यासाठी बर्फाने शेक द्यावा. सुजलेल्या ग्रन्थिवंर बर्फ ठेवावा. ताप कमी करण्यासाठी आयबुप्रोफेन आणि असिटॅमिनोफेन सारखी औषध घ्यावीत.

## अवयवदान जागरूकता: देशाची तातडीची गरज

जागतिक अवयवदान दिन दरवर्षी जगभरात अवयवदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी आणि नागरिकांना मृत्यूनंतर अवयवदान करण्याची प्रतिज्ञा करण्यास प्रेरित करण्यासाठी पाळला जातो. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की आपण गेल्यानंतरही जीव वाचवू शकतो.जागतिक स्तरावर, जागतिक आरोग्य संघटनेचा (WHO) अंदाज आहे की दरवर्षी १,३०,००० हून अधिक अवयव प्रत्यारोपण केले जातात, परंतु हे जगभरातील गरजेच्या फक्त १०% भाग पूर्ण करते. ज्या देशांमध्ये जास्त जागरूकता आणि सुव्यवस्थित दाता प्रणाली आहेत त्यांनी लक्षणीयरीत्या चांगले परिणाम साध्य केले आहेत, ज्यावरून असे दिसून येते की अवयवदान हा सामाजिक रूढी बनतो तेव्हा काय शक्य आहे.

**जनआरोग्य**

अवयवदान करणारा असा कोणीही असू शकतो ज्याचे निरोगी अवयव तातडीने गरजू रुग्णाला प्रत्यारोपित केले जातात. मेंदूच्या मृत्यूनंतर किंवा हृदयविकाराच्या मृत्यूनंतर दान केलेले हे अवयव जतन केले जाऊ शकतात आणि अनेक जीव



वाचवण्यासाठी प्रत्यारोपित केले जाऊ शकतात. अशा देणग्या केवळ आरोग्य पुनर्संचयित करत नाहीत तर प्राप्तकर्त्यांना सामान्य आणि परिपूर्ण जीवन जगण्याची दुसरी संधी देखील देतात."दरवर्षी, १.८ लाखांहून अधिक भारतीयांना शेवटच्या टप्प्यातील मूत्रपिंडाचा आजार होतो, तरीही देशभरात फक्त १२,००० मूत्रपिंड प्रत्यारोपण होतात. अवयवदानाच्या दरात थोडीशी वाढ झाली तरी हजारो रुग्णांना जीवनाची दुसरी संधी मिळू शकते. अवयवदानाची प्रतिज्ञा करून, आपल्यापैकी प्रत्येकजण अवयव दान करून आपल्या देशातील हजारो लोकांचे प्राण वाचवून त्यांना जीवदान देऊ शकतो. अवयव दानाला प्रोत्साहन देण्यात तेलंगाना सारखे राज्य हे आघाडीवर असून त्यांनी मोठ्या प्रमाणात अवयव दान करून इतर राज्यापुढे आपला आदर्श ठेवलेला आहे.

## बहुगुणी अश्वगंधा



**आरोग्यम् धन संपदा**

रोग प्रतिकारशक्ती मजबूत करण्याचे अनेक मार्ग आहेत. जीवनशैली सुधारून आणि पौष्टिक आहार घेतल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करता येते. याशिवाय रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याच्या आयुर्वेदिक पद्धतीही आहेत. भारतीय घरांमध्ये काही आयुर्वेदिक औषधी वनस्पती आढळतात, ज्यांचे योग्य प्रमाणात सेवन केल्यास रोगप्रतिकार शक्ती मजबूत होते. या आयुर्वेदिक वनौषधीं पैकी अश्वगंधामध्ये औषधी गुणधर्म आहेत, ज्याच्या सेवनाने आरोग्याला अनेक फायदे मिळतात. अश्वगंधा हे पौष्टिक आणि आयुर्वेदिक औषध आहे जे वनस्पतीच्या वनौषधीं पासून मिळते. अश्वगंधामध्ये विटानोलाइड्स आढळतात. विथॅनोलाईड्स मानसिक स्थिती सुधारण्यास, तणाव कमी करण्यास आणि शरीराची ताकद वाढविण्यात मदत करतात. अश्वगंधामध्ये अल्डोस्टेरॉन असते जे स्त्रियांमध्ये हार्मोन्सचे प्रमाण संतुलित करण्यास आणि लैंगिक आरोग्य सुधारण्यास मदत करते. शरीराचे रोगांपासून संरक्षण करतात. अश्वगंधाचे सेवन केल्याने लैंगिक आरोग्य सुधारण्यास मदत होते. याशिवाय झोप चांगली लागते आणि स्मृतीभ्रंशाची तक्रार दूर होते.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# संतोष देशमुख प्रकरणात कोर्टात तीन तास सुनावणी

## वाल्मिक कराडच्या वकिलांचा पावणेदोन तास जोरदार युक्तिवाद

**बीड, दि. १८ प्रतिनिधी**

बीडच्या मस्साजोगमध्ये सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची आज बीडच्या मकोका कोर्टात तब्बल तीन तास सुनावणी पार पडली. आरांपी वाल्मिक कराडच्या वकिलांनी तब्बल पावणेदोन तास जोरदार युक्तिवाद केल्यानंतर न्यायालयाने कोणताही निर्णय देता तो राखून ठेवला असून या प्रकरणी पुढील सुनावणी ३० ऑगस्ट रोजी होणार आहे .

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कराडच्या जामीन अर्जाला तीव्र विरोध दर्शवला. एवढंच नव्हे तर या खटल्यातील इतर आरोपींना दोषमुक्त करण्याच्या मागणीवरही



त्यांनी ठाम आक्षेप घेतला. "हा खटला गंभीर असून आरोपींना कोणतीही सवलत मिळू नये," असा ठाम पवित्रा निकम यांनी न्यायालयात मांडला. आरोपींना जामीन मिळतो का, दोषमुक्त केले जाते का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. ३० ऑगस्ट रोजी होणाऱ्या पुढील सुनावणीकडे आता सर्वांचं डोळे लागले असून या दिवशी न्यायालयीन निर्णयाची दिशा ठरण्याची शक्यता आहे.

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी सरपंच देशमुख हत्या प्रकरणात आरोपी वाल्मीक कराडच्या जामीन अर्जाला न्यायालयात जोरदार विरोध केला. या प्रकरणातील दुसरा आरोपी विष्णू चाटे याने दाखल केलेल्या दोषमुक्ती अर्जावरही निकम यांनी सडेतोड युक्तिवाद केला. आजची सुनावणी तब्बल तीन तास पार पडली.. यामध्ये वाल्मीक कराडच्या वकिलाने १ तास ४५ मिनिटे युक्तिवाद केला..

अटक करताना कराडला अटकेची कारणे सांगितली गेली नव्हती. मात्र, निकम यांनी हा दावा खोडून काढला. तसेच आवादा कंपनीचे कर्मचारी सुनील शिंदे यांनी रेकॉर्ड केलेल्या फोन कॉलची तारीख चुकीची असल्याचा आरोपींचा दावा निकम यांनी सीडीआर (कॉल डिटेल रेकॉर्ड्स) सादर करून फेटाळला. "सीडीआरनुसार कराडने त्या दिवशी फोन केल्याची नोंद आहे," असे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. या संभाषणाशी संबंधित प्रत्यक्ष पुरावे योग्य वेळी सादर केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

# विजयकुमार गावित सर्वात भ्रष्ट माणूस - के.सी. पाडवी



**नंदुरबार, दि. १८ प्रतिनिधी**

नंदुरबार जिल्ह्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते चोर आहेत. कुठल्याही काँग्रेस आणि शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी तुम्हाला त्रास दिला तर त्यांना माझे नाव सांगा. मी तुमच्यासोबत आहे. त्यामुळे कुणालाच घाबरायचे काम नाही. शिवसेना आणि काँग्रेसचे नेते चोर आहेत, असे विधान माजी मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले होते. आता यावरून माजी मंत्री आणि काँग्रेस नेते के. सी. पाडवी यांनी डॉ. विजयकुमार गावित यांच्यावर थेट भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत त्यांच्यावर सडकून टीका केली आहे. डॉ. गावित हे 'सर्वात भ्रष्ट माणूस' असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

के. सी. पाडवी म्हणाले की, फक्त विरोधकांना नव्हे तर त्यांच्यासोबत युती असलेल्या शिवसेनेला आणि काँग्रेसला त्यांनी चोर म्हटलं आहे. निश्चितपणे आमदार महोदय हे माजी मंत्री देखील आहेत. ते माजी मंत्री किती वेळा झाले, किती वर्ष ते सत्तेमध्ये राहिले, हे संपूर्ण जनतेला माहिती आहे. त्यांनी २००४ ते २००९ या काळात आदिवासी खात्यात जो भ्रष्टाचार केला त्यात अजूनही प्रत्येक आश्रम शाळेत साहित्य सडत पडलेले आहे. डॉक्टर गावित यांच्यावर गायकवाड समिती नेमण्यात आलेली आहे. त्यांची केस हायकोर्टात सुरू आहे. त्यांच्यावर सहा हजार कोटीच्या भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत, असा आरोप त्यांनी केला.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये तुफान पाऊस

## हजारो हेक्टर शेती पाण्याखाली

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ प्रतिनिधी**

सततच्या पावसाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला जोरदार फटका बसला आहे. जिल्ह्यातील अनेक तालुके आणि मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी वीज पडल्याच्या घटनांची नोंद झाली असून शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

हवामान विभागानुसार, आज छत्रपती संभाजीनगरला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. संभाजीनगरसह मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तुफान पाऊस सुरू आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर कायम आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली गेले आहे. यामध्ये अनेक ठिकाणी पिकांची नासाडी झाली असून, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे.

जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सुदैवाने कुठेही जीवितहानी झालेली नाही. परंतु वीज पडल्याच्या घटनांमध्ये काही ठिकाणी जनावरांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या नुकसानीचे



पंचनामे करण्याचे काम फिल्ड ऑफिसरच्या माध्यमातून सुरू आहे. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातील शहर, तालुके आणि गावं ओलेचिंब झाली आहेत. जर असाच पाऊस पुढील काही दिवस चालू राहिला, तर अतिवृष्टीची शक्यता मोठ्या प्रमाणावर वर्तवण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा निसर्गाचं संकट कोसळलं आहे. प्रशासन सतत परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे, परंतु पावसाचा जोर वाढल्यास आगामी दिवसांत अडचणी अधिक वाढू शकतात.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219